ebook

( पु.ल.आपल्या भेटीला )



# पुन्हा एकदा असा मी असामी

( भाग - दोन )

डॉ. वीरेंद्र वसंत ताटके

# या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

## पुन्हा एकदा

## असा मी असामी-२

### हे पुस्तक फुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो, मजा येते.

पण

### तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# पुन्हा एकदा

# असा मी असामी

## - भाग दोन

(पु. ल. आपल्या भेटीला)

## डॉ वीरेंद्र वसंत ताटके



पुन्हा एकदा असा मी असामी- भाग २
लेखक- डॉ वीरेंद्र वसंत ताटके

पत्ता - ए - १०५, वनाज परिवार सोसायटी,
कोथरूड, पुणे, ४११०३८
मोबाईल क्रमांक - ९२२५५११६७४
मेल आयडी – tatakevv@yahoo. com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www. esahity.com

www. esahity.in

esahity@gmail.com

प्रकाशन : १२ जून २०२१(पु ल देशपांडे स्मृतीदिन)

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.


तुळशी वृंदावन ते कॅक्ट्स ते
स्मार्ट मोबाईल
SAMSUNG

# डॉ वीरेंद्र वसंत ताटके




(M. Com, MBA, PhD, FICWA, NISM)

डॉ वीरेंद्र वसंत ताटके हे कॉर्पोरेट क्षेत्रात आणि शिक्षण क्षेत्रात फायनान्स आणि कॉस्टिंग या विभागात गेली पंचवीस वर्षे कार्यरत आहेत. ते इन्स्टिटयुट ऑफ कॉस्ट अकौंटंट्स ऑफ इंडियाचे फेलो मेंबर असून फायनान्स विषयात त्यांनी पीएचडी संपादित केली आहे. गुंतवणूक विषयावर त्यांची अनेक पुस्तके प्रसिद्ध झाली असून आकाशवाणी, दूरदर्शनवर गुंतवणूक विषयावर त्यांच्या मुलाखती प्रसारित झाल्या आहेत. बॉम्बे स्टॉक एक्सचेंज आणि असोसिएशन ऑफ म्युच्युअल फंड्स ऑफ इंडिया यांच्यातर्फे घेतल्या जाणाऱ्या गुंतवणूक कार्यशाळेचे ते ट्रेनर आहेत. याशिवाय ते वर्तमानपत्रांतून गेली अठरा वर्षे लेखन करत आहेत. सध्या ते पुण्यातील एका एमबीए महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून कार्यरत आहेत.

पु. ल. देशपांडे यांचे लिखाण हा त्यांच्या विशेष जिव्हाळयाचा विषय आहे. पुलंच्या हयातीत त्यांच्यासोबत पत्रव्यवहार करणे आणि त्यानंतर पुलंच्या जन्मदिवशी आणि स्मृतिदिनादिवशी पुण्यातील त्यांच्या निवासस्थानाला भेट देणे यातून वीरेंद्र ताटके हे पुलंसोबत अप्रत्यक्षपणे हितगुज करत असतात.

# 'पुलं'कीत ठेवा




पु. ल. देशपांडे

पुणे ४.
३१.३.८३

प्रिय विरेन्द्र,

तू पाठवलेले अभिनंदनपर पत्र मिळाले. मन:पूर्वक धन्यवाद

तुझा
पु. ल. देशपांडे



17/11/89

पु. ल. देशपांडे
१ रूपाली,
७७७ शिवाजीनगर
पुणे ४११००४

श्री वीरेन्द्र तारके यांस स.न.

तुमचे पत्र मिळाले.
पत्रातून व्यक्त केलेल्या तुमच्या स्नेहभावनेबद्दल आणि शुभेच्छांबद्दल मन:पूर्वक धन्यवाद.

तुमचा
पु. ल. देशपांडे

# लेखकाचे मनोगत

‘पुन्हा एकदा असा मी असामी-भाग एक’ या पुस्तकाचे ई साहित्यातर्फे १४ मे २०२१ (अक्षय तृतीया) रोजी प्रकाशन झाल्यानंतर लगेचच या पुस्तकाचा दुसरा भाग प्रकाशित होत आहे. पुलंच्या स्मृतिदिनी म्हणजेच १२ जून २०२१ रोजी हे पुस्तक प्रकाशित होत आहे याचा विशेष आनंद होत आहे.

पहिल्या भागाप्रमाणेच या भागातही धोंडोपंत आणि कुटुंबीय आपल्याला आनंद देतील याची खात्री वाटते . अर्थात याचे सारे श्रेय फक्त पुलंचे आहे. त्यांनी निर्माण केलेली पात्रे मनात इतकी पक्की घर करून बसलेली आहेत की लिहताना वेगळे कष्ट पडत नाहीत.


ज्या वाचकांना पुस्तकाचा पहिला भाग वाचायचा आहे ते बाजूच्या चित्रावर क्लिक करून तो विनामूल्य डाउनलोड करू शकतील. पहिल्या भागाप्रमाणेच दुसऱ्या भागाचे हे पुस्तक विनामुल्य प्रकाशित होत आहे.

पुस्तकाच्या लिखाणातून कोणाचेही मन दुखविण्याचा हेतू नाहीए; परंतु नजरचुकीने तसे झाले असल्यास त्यांची आधीच माफी मागतो. वाचकांनी पुस्तकाच्या दोन्ही भागांविषयी अभिप्राय

आणि सूचना ९२२५५११६७४या माझ्या मोबाइल क्रमांकावर फोन करून किंवा व्हाट्सअँप मेसेज करून अवश्य द्यावेत ही विनंती.

- डॉ वीरेंद्र वसंत ताटके


संपर्क
डॉ वीरेंद्र वसंत ताटके
पत्ता - ए - १०५,
वनाज परिवार सोसायटी,
कोथरूड, पुणे, ४११०३८
मोबाईल क्रमांक -
९२२५५११६७४
मेल आयडी –
tatakevv@yahoo.com


पुन्हा एकदा… चा भाग १ वाचायचाय? या चित्रावर क्लिका. बस्स. सोप्पंय.

**निवेदन :-**

पुस्तकातील चित्रे मी स्वतः रेखाटली आहेत. ती चित्रे पाहताना पुलंच्या दामले मास्तरांच्या, “लेका, चित्रं काढली आहेस का X X X X X कागदावर?” या वाक्याची आठवण वाचकांना नक्की होईल.

- डॉ वीरेंद्र वसंत ताटके

**II अर्पणपत्रिका II**

(मनोहरी आठवणी)




फ्लॅटच्च्या दारावरील ‘पु. ल. देशपांडे’ ही वळणदार आणि रंगीत अक्षरे पाहूनच मन रोमांचित झालं. दारावरील बेल वाजवली तर दार उघडायला साक्षात सुनीताबाई! तोच करारी चेहरा. डोळ्यावर चष्मा, रुपेरी केस, फिकट रंगाची साडी आणि चेहऱ्यावर अत्यंत शांत भाव!

माझ्या गोंधळलेल्या चेहऱ्याकडे पाहून त्यांनी विचारलं, ‘‘कोण हवंय आपल्याला?’’

‘‘मी साताऱ्याहून आलो आहे. हे पुलंचेच घर ना? मी पुलंच्या फोटोचे दर्शन घ्यायला आलो आहे. आज त्यांचा जन्मदिवस आहे ना!’’ मी एका दमात संपूर्ण स्पष्टीकरण दिलं.

फ्लॅटचे दार पूर्ण उघडून ‘‘या’’ असे म्हणत त्यांनी मला हॉल मध्ये बसण्याची खूण केली आणि हळूहळू आतील खोलीच्या दिशेने चालत गेल्या. त्यांच्या चालण्यात एक प्रकारचा संथपणा जाणवत होता.

हॉलमध्ये मोठ्या टीपॉयवर पुलंचा प्रसन्न फोटो ठेवलेला होता. फोटोला ताज्या फुलांचा हार होता. आणि थोडी फुलं फोटोसमोर ठेवली होती. भिंतीवर एका बाजूला गुरुदेव रवींद्रनाथ टागोरांचा फोटो होता तर दुसऱ्या बाजूला चार्ली चॅप्लिनचा फोटो होता. पुलंच्या फोटोसमोर दोन क्षण डोळे मिटून शांत बसलो. नेमकं त्यावेळी शेजारच्या फ्लॅटमधून कुमार गंधर्वांचं गाणं ऐकू आलं. .... तसं गाणं सुरु होतं का मला भास झाला हे कळलं नाही पण तो क्षण आयुष्यभरासाठी मनात जपला गेला.

तेवढ्यात सुनीताबाई हातात पाण्याचा तांब्या-भांडे आणि एका डिशमध्ये फळं घेऊन आल्या आणि शांतपणे खुर्चीत बसत मला म्हणाल्या, “काय करता आपण?”

त्यांच्या या प्रश्नावर मी भाबडेपणाने “पुलंची पुस्तकं वाचतो”असं उत्तर दिलं.

माझ्या या उत्तरावर मंदपणे हसल्या आणि म्हणाल्या,"दर्शनाला शक्यतो सकाळी किंवा संध्याकाळी येत जा. अलीकडे माझी तब्येत बरी नसते त्यामुळे दुपारी मी थोडा वेळ झोपते.”

मला अपराध्यासारखे वाटले. हे त्यांच्या लगेच लक्षात आले. त्यांनी विषय बदलून माझी चौकशी केली आणि पुन्हा येण्याचे आमंत्रण दिले.

त्यानंतर पुलंच्या प्रत्येक जन्मदिनी आणि स्मृतिदिनी पुण्यातील भांडारकर रस्त्यावरील 'मालती - माधव' या इमारतीतील त्यांच्या फ्लॅटमध्ये जाण्याचा योग आला.

खरं तर पुलंच्या जाण्यानंतर सुनीताबाई मनाने खचल्या होत्या. मात्र त्यांनी स्वतःचं लिखाण आणि पुलंच्या अप्रकाशित लेखांचं प्रकाशन करण्याचे काम सुरु ठेवलं होतं. स्वतः सुनीताबाई सिद्धहस्त लेखिका, अभिनेत्री आणि संवेदनशील व्यक्ती होत्या मात्र

पुलंच्या हयातीत त्यांनी 'पुलं-पत्नी' म्हणून स्वतःची ओळख मनापासून निभावली,पुलंमधील कलाकाराला पूर्णपणे मोकळीक देऊन व्यवहार सांभाळण्याचे किचकट काम स्वतः केलं. हे सर्व करताना बोलण्यातील स्पष्टपणा मात्र त्यांनी शेवटपर्यंत जपला. त्यांच्या ' आहे मनोहर तरी ' या पुस्तकातील पुलंच्या स्वभावाचं थोडं स्पष्ट शब्दात त्यांनी केलेलं विश्लेषण वाचून मी थोडसं चिडूनच त्यांना पत्र लिहलं होतं. एका सामान्य वाचकाचं पत्र म्हणून त्याकडे त्या दुर्लक्ष करू शकल्या असत्या, मात्र पत्राला उत्तर देऊन त्यांनी सुखद धक्का दिला होता. उत्तम लेखिका म्हणून त्यांची ओळख कायम स्मरणात राहीलच पण त्याचबरोबर पुलंसारख्या प्रतिभावान लेखकाला अप्रत्यक्षपणे प्रेरणा देणारी सहचारिणी म्हणून देखील त्यांची आठवण कायम राहील.

स्वतः पुलंदेखील विनोदानं म्हणायचे "आमच्या घरात मी देशपांडे आणि ही 'उपदेश' पांडे".

या जगाचा निरोप घेताना देखील सुनीताबाई मनाला चटका लावून गेल्या. त्या दुर्दैवी दिवशी आकाशवाणीवरील सकाळच्या बातम्यात त्यांच्या निधनाची बातमी सांगितली गेली आणि वैकुंठ येथे सकाळी आठ वाजता अंत्यसंस्कार असल्याचे कळाले. अनेकजण वैकुंठकडे धावले, परंतु अगदी काही मिनिटं उशीर

झाल्यामुळे माझ्याप्रमाणेच अनेकांना त्यांचे अंतिम दर्शन झाले नाही. आयुष्यभर वेळेचा काटेकोरपणा पाळलेल्या सुनीताबाईंनी जातानादेखील वेळ अगदी काटेकोरपणे पाळली होती!

वैकुंठभुमीतील त्या अग्नीतून धुराचे लोट हवेत विरत होते.... त्यातील एका उंच जाणाऱ्या नादबद्ध लकेरीकडे पाहत उपस्थितांपैकी एक ज्येष्ठ नातेवाईक महिला म्हणाल्या, “पोहचली आपली सुनीता भाईंकडे!”

सर्वांचेच डोळे पाणावले.

आजही भांडारकर रस्त्यावरून जाताना 'मालती-माधव' इमारतीवरील नीलफलकाकडे पाहून जुन्या आठवणी पुन्हा ताज्या होतात. या दांपत्याने आपल्याला दिलेल्या ' मनोहरी आठवणी ' कायम तशाच राहतील.

वीरेंद्र वसंत ताटके

पुणे ४,
४-१२-९२.

सप्रेम नमस्कार.


आपले पत्र मिळाले. माझे पुस्तक तुम्ही खूप बारकाईने वाचले आणि मोकळेपणाने पत्र लिहून प्रतिक्रिया कळवली त्याबद्दल मनापासून आभारी आहे.

आपले पुस्तक वाचकाला आवडले तर लेखक सुखावतो हे तर खरेच. पण तो वाचक कुणी साधासुधा नसून समजदार आहे, इतरही खूप काही त्याने वाचले आहे, त्याला कवितेचीही जाण आहे वगैरे लक्षात आल्यावर होणाऱ्या आनंदाची प्रत काही वेगळीच असते.

Thank you.

आपली

सुनीता देशपांडे



## अनुक्रमणिका

१. आवाज... आवाज

२. आणखी एक नवीन ग्रहयोग

३. पायताण खरेदीची ओढाताण!

४. रिक्षा

५. शंकरची शिकवणी

६. शंकर जाणार कथ्थकच्या क्लासला!!

७. ' धोंडोपंतांना आले कॉलेजचे निमंत्रण '

८. शंकरने दिला सुखद धक्का

अगदी पहाटे शीळ घालणारा पक्षी, त्यानंतर थोडं उजाडायला लागलं की किलबिलाट करत येणाऱ्या चिमण्या, दुपारच्या वेळी कावकाव करणारे कावळे, संथ गतीने "कुप- कुप- कुप" आवाजाची एकाच लयीत मालिका करत राहणारा भारद्वाज पक्षी ही सारी मंडळी त्यांचा पारंपारिक आवाज राखून आहेत



# १. आवाज... आवाज

बहुचर्चित एकविसावे शतक सुरु झाले आणि माझ्या आवाजाच्या दुनियेत मोठे लोक म्हणतात तसा 'आमूलाग्र' बदल झाला. काही जुने आवाज पूर्णपणे गायब झाले तर काही नव्या स्वरूपात पुढे आले. पूर्वी कधीही न ऐकलेल्या आवाजांची भर देखील त्यात रोज पडत असते. या बदललेल्या आवाजांची सुरुवात अगदी पहाटेपासूनच होते. पूर्वी किटलीतून दूध घेऊन येणारा आणि ' बाई दो sss ध ' ची हाकाळी देणारा दूधवाला आताशा पिशवीतले दूध ' टाकतो ' … पहाटे पहाटे त्याची टू व्हीलर बिल्डिंगच्या खाली थांबल्याचा आणि नंतर लिफ्टच्या दरवाजाचे उघडण्याचे आणि बंद होण्याचे आवाज मी रोज ऐकतो … त्यानंतर तो आमच्या मजल्यावर येतो ……दारात अडकवलेल्या पिशवीत अर्धा लिटर 'गोकुळ' टाकतो हे सुद्धा मला ऐकू येतं ……. महिन्याच्या शेवटी दुधाबरोबर दरवाजाला अडकवलेला बिलाचा कागद सुद्धा ऐकू येतो. ……लगेच शेजारचे बळवंतराव त्यांच्या फ्लॅटचे दार उघडून दुधाची पिशवी घेऊन फ्रिजमध्ये ठेवतात तेव्हा त्या फ्रिजच्या उघडलेल्या दरवाजामुळे मला रोज अंथरुणातच थंडी वाजते ……

तेवढ्यात सायकलवरून जात नेमका आमच्या ग्यालरीत आमचा 'सकाळ'..... शेजाऱ्यांकडे 'लोकसत्ता' ....... पलीकडे ' मटा ' टाकल्याचा आवाज येतो. ....... मला एकदा या पेपरवाला पोऱ्याला पूर्णपणे बघायचा आहे. एकदोनदा खिडकीतून पाहण्याचा प्रयत्न केला पण कानटोपी, अर्ध्या बाह्यांचा सदरा, विजार एवढंच दिसलं.......... सायकलवरून न उतरता नेमका नेम धरून भालाफेक सारखा हा पठ्ठ्या ‘ पेपरफेक ‘ कुठे शिकला आहे हे मला त्याच्याकडून समजून घ्यायचे आहे.

तेवढ्यात वरच्या मजल्यावरून आजोबांच्या देवपूजेतील घंटा ऐकू येते..... नंतर त्यांनी पुटपुटलेले स्तोत्र.. नंतर आरतीत त्यांनी एकट्याने वाजवलेल्या टाळया... नंतर घालीन लोटांगणला आजोबांनी स्वतः भोवती घातलेली प्रदिक्षणा... सगळं ऐकू येतं! अलीकडे त्या टाळयांचा आणि घंटेचा आवाज थोडा अशक्त यायला लागला आहे.

थोडं उजाडायला लागतं तसा आमच्या बिल्डिंगची सफाई करणारा कामगार त्याच्या टुव्हीलरवरून आल्याचा आवाज येतो. त्याचा आणि सोसायटीच्या वॉचमनचा अगम्य भाषेत चाललेला संवाद आणि ‘गायछाप’ची देवाणघेवाण ऐकू येते.

हे दोघे इतक्या कोणत्या गहन विषयावर रोज चर्चा करत असतात याचा कानोसा घ्यायचा मी अनेकदा प्रयत्न केला पण एक शब्द कळेल तर शपथ!!

त्यानंतर शाळेतल्या मुलांचे रिक्षावाले आणि व्हॅनवाले काका आपापल्या गाड्या सोसायटीतील इतर वाहनांना अडचण होईल अशा रीतीने पद्धतशीरपणे उभ्या करून गप्पा हाणत बसल्याचा आवाज ऐकू येतो. मग सोसायटीचे सन्माननीय सभासद-पदाधिकारी आणि त्या काका लोकांची रोजची बाचाबाची! (ही बाचाबाची अगदी त्या म्हैस मधील बाचाबाची सारखी "बा.. चा... बा... ची..." असते). ही सारी गंमत बघत "यामुळे आज शाळेला सुट्टी मिळेल का" या विचाराने आनंदित झालेल्या पोरांचा कलकलाट ऐकू येतो. हा सारा गोंगाट निस्तरतोय तोवर 'व्यांग-व्यांग' करत दोन चार बुलेट गाड्यावरून सोसायटीतील दादा मंडळी जातानाचा आवाज येतात. तोपर्यंत सकाळीसकाळी आपल्या मालकांना फिरायला घेऊन गेलेली कुत्री परत येतात ....... त्या तीनचार कुत्र्यांचे एकमेकांवर विनाकारण गुरगुरण्याचे आवाज ऐकू येतात......... त्यापाठोपाठ त्यांच्या मालक लोकांचा "कीप क्वायट टायगर" आणि मालकिणीचा "नो,सोना बेटा" असले आवाज न चुकता येतात.

पलीकडच्या फ्लॅटमधून “बाय मम्मी... येते मी....” असा आवाज आणि त्यामागून क्रमाक्रमाने.... फ्लॅटचे दार बाहेरून ओढून लावल्याचा आवाज.... लिफ्ट उघडझाप आवाज.... पार्किंगमधून बटनस्टार्ट स्कुटी गाडी सुरु केल्याचा आवाज येतो.

आता हळूहळू सोसायटी शांत होऊ लागते. दुपारी फक्त टिपेच्या स्वरात ओरडणारी भाजीवाली आणि शिरा ताणून ' बंघार..... ब्याटली... लोखांड..... रद्दी ' अशा अनुनासिक स्वरात ओरडणारा एक भंगारवाला यांचे आवाज आळसावलेल्या बिल्डिंगची झोपमोड करून जातात.... त्यानंतर शाळेत गेलेली पोरं परत येईपर्यंत शांतता....!

संध्याकाळी पुन्हा आवाजांची दुनिया सुरु होते. सोसायटीच्या खालून “रुग्वेद, आर यू कमिंग फॉर फ़ुटबॉल?” अशी आरोळी....... त्यावर नवव्या मजल्यावरून “रुग्वेद हॅज गॉन फॉर स्विमिंग” असा प्रतिसाद. मग पार्किंगमध्ये सुरु झालेल्या फुटबॉल मॅचचा आवाज.... कोणालातरी बॉल लागतो....... मग परस्पर एकाने एका फुटबॉलपट्टूला पाठीत घातलेला धपका ......... अचानक पळापळ सुरु होते... आणि मॅच स्थगित होते.

थोड्या वेळाने घराघरातून स्वयपांकवाल्या काकू आलेल्याचा आवाज.... आणि त्यांना दिल्या जाणाऱ्या ... “फ्रिजमध्ये

सकाळची भाजी असेल बघ... आत्ता कमीच टाक" असल्या सूचनांचा भडीमार. सात साडेसात वाजले की सगळयांचे टीव्ही सुरु. वेगवेगळया टीव्हीवर सुरु असलेल्या वेगवेगळया भाषांमधील रडक्या, आनंदी, गंभीर, अतिगंभीर अशा वेगवेगळया आशयाच्या मालिका ....... फक्त वरच्या मजल्यावरून पुन्हा एकदा आजोबांच्या आरतीचा आणि घंटेचा आवाज... आणि त्यानंतर येणार उदबत्तीच्या सुगंधाचा दरवळ.

रात्र झाली तरी आवाज कमी होत नाहीत..... लोक म्हणतात त्याचा त्रास होतो...... पण मला वाटतं त्या आवाजांमुळे जिवंतपणा टिकून राहतो.

काही आवाज मात्र अगदी हृदय पिळवटून टाकतात. जसं की, रात्री बेरात्री येणार अँम्बुलन्सचा आवाज. अशावेळी जात, धर्म, पंथ सारं काही विसरून त्या अनामिक माणसासाठी मन प्रार्थना करू लागतं आणि त्यातच झोप लागून जाते.

या सर्व आवाजात दिलासा देणारी गोष्ट म्हणजे सर्व पक्षांचे आवाज मात्र अजूनही तसेच टिकून आहेत. अगदी पहाटे शीळ घालणारा पक्षी, त्यानंतर थोडं उजाडायला लागलं की किलबिलाट करत येणाऱ्या चिमण्या, दुपारच्या वेळी कावकाव करणारे कावळे,

संथ गतीने "कुप- कुप- कुप" आवाजाची एकाच लयीत मालिका करत राहणारा भारद्वाज पक्षी ही सारी मंडळी त्यांचा पारंपारिक आवाज राखून आहेत.


मला आजही वाटतं की गडबड - आवाज - आरडाओरडा हे मुळी मनमोकळ्या स्वभावाचं लक्षण आहे. म्हणूनच मला अगदी शांत असणाऱ्या सोसायट्या स्वभावाने शिष्ठ वाटतात.

एखादा दिवस सोसायटी पूर्णपणे शांत असली की मला ते असह्य होतं आणि मी मनातल्या मनात जोरात ओरडतो "आवाज.... आवाज.....!"

* * * * * * * * * * * * * * * * * *

## २. आणखी एक नवीन ग्रहयोग

आमचा अलीकडील अभ्यास सांगतो की सध्याच्या काळात बहुतेक प्रत्येकाच्या कुंडलीत आढळणारा योग म्हणजे व्हाट्सअँप -फेसबुक-लाईक ग्रहयोग! आम्ही अभ्यास केलेल्या शंभर माणसांपैकी ९९ माणसांच्या कुंडलीत हा ग्रहयोग आढळला.



## २. आणखी एक नवीन ग्रहयोग

आम्ही पूर्वीच म्हणून ठेवल्याप्रमाणे ज्योतिषांचे दोन प्रकार असतात. एक कुंडल्यावरून माणसे ओळखतात तर दुसरे माणसांवरून कुंडली मांडतात. आमचा अभ्यास दुसऱ्या प्रकारचा आहे. आम्ही नुसत्या चेहऱ्याकडे पाहून माणसाची कुंडली सांगतो. काळानुसार कुंडल्या बदलल्या आणि कुंडलीत नवीन ग्रहयोग आले. अशाच एका नवीन ग्रहयोगाबद्दल आपण आज बोलणार आहोत..

आमचा अलीकडील अभ्यास सांगतो की सध्याच्या काळात बहुतेक प्रत्येकाच्या कुंडलीत आढळणारा योग म्हणजे व्हाट्सअँप -फेसबुक-लाईक ग्रहयोग! आम्ही अभ्यास केलेल्या शंभर माणसांपैकी ९९ माणसांच्या कुंडलीत हा ग्रहयोग आढळला आणि कुंडलीत हा ग्रहयोग न आढळलेला शंभरावा माणूस म्हणजे सहा महिन्याचे मूल होते, असो.

कुंडलीत हा ग्रहयोग कोणत्या घरात आहे त्यावर त्याची ठळक फलिते अवलंबुन आहेत. दुर्दैवाने हा योग चुकीच्या ठिकाणी

म्हणजे अनिष्ट घरात असला तर त्याचा फटका बसलाच म्हणून समजा. पण सुदैवाने हा योग चांगल्या घरात असला तर मग मात्र काही विचारू नका. असा माणूस म्हणजे ' आनंदाचे डोही आनंद तरंग ' अशा उन्मनीय अवस्थेत असतो. या माणसाने व्हाट्सअँपवर एखादा जुनाट आणि अनेक ग्रुपवर फिरूनफिरून अगदीच मिळमिळीत झालेला किस्सा टाकला तरी त्याला तुडुंब लाईक आणि स्माईली मिळतात. यांचे भाग्य असे की हे जेव्हा ऑनलाईन असतात तेव्हा त्यांना अचानक एखाद्या ग्रुपवरून नवा करकरीत विनोद येतो आणि एका क्षणाचीही उसंत न घेता हे लोक तो विनोद स्वतःच्या नावावर खपवून पुढील ग्रुपवर ढकलून देतात आणि प्रसिद्धदेखील होतात.

यांचा निगरगट्टपणा एखाद्या राजकीय पुढाऱ्याला सुद्धा लाजवेल असा असतो. हा गुण देखील हा ग्रहयोग पत्रिकेत उत्तम ठिकाणी असल्याचे फलित असते. .... पुन्हा एकदा असो!!

या निगरगट्टपणामुळे हे लोक इतरांचे विनोद, किस्से, कविता, लेख स्वतःचेच असल्याचे ठामपणे सांगतात. या ग्रहयोगावर जन्मलेल्या आमच्या पाहण्यातील एका प्राध्यापकाने (विषय - मराठी, २७ पाठयपुस्तके, १७ कवितासंग्रह, २१ शोधनिबंध) व्हाट्सअँप ग्रुपवर काही कविता स्वतःच्या नावावर खपवून लाखो

लाईक्स मिळवल्या होत्या. शेवटी याच ग्रहयोगावर जन्मलेल्या दुसऱ्या एका पुणेरी प्राध्यापकाने (विषय - इतिहास, ३१ पाठयपुस्तके, २३० आवेशपूर्ण गीते, २८७ शोधनिबंध) ती पदे त्या कविता  त्या मराठी प्राध्यापकाच्या नाहीत असा अभ्यासपूर्ण शोधनिबंध लिहून तो शेकडो व्हाट्सअँप ग्रुपवर फिरवला आणि पहिल्यापेक्षा २७ जास्त लाईक मिळवल्या तेव्हा ते प्रकरण थांबले. हा प्रसंग आम्ही एके रविवारी आमच्या एका मित्राच्या घरी पोहे खायला गेलो होतो तेव्हा तेथे आलेल्यापैकी कोणालातरी त्यांच्या नातेवाईकांच्या मित्राने (पोह्याची तिसरी डिश चेपवता चेपवता) सांगितल्याचे ऐकले होते. या दोनही प्राध्यापक महाशयांच्या कुंडलीत व्हाट्सअँप-फेसबुक- लाईक हा ग्रहयोग अगदी तुल्यबळ ठिकाणी असणार यात शंका नाही.

या ग्रहयोगावर जन्मलेल्या लोकांच्या फेसबुक अकाउंटचे आम्ही बारकाईने सर्वेक्षण केले तेव्हा प्रत्येकाच्या फ्रेंड्सची संख्या पाच हजार असल्याचे आमच्या (अभ्यासपूर्ण इ. इ.) सर्वेक्षणात पुढे आले. आम्ही याविषयी एक लेख लिहून आमच्या फेसबुकवर टाकला पण तीन लाईक आणि एक कॉमेंट वगळता काहीही पदरात पडले नाही (कॉमेंट नक्की काय होती असले आगाऊ प्रश्न कृपया विचारू नयेत). त्यामुळे आमची पत्रिका एखाद्या तज्ञ ज्योतिषाला दाखविण्याचा आम्ही विचार करत आहोत. तूर्तास आमच्या

अभ्यासपूर्ण सर्वेक्षणाकडे वळू. कुंडलीत हा ग्रहयोग असलेल्या माणसांनी त्यांच्या फेसबुकवर कितीही फालतू पोस्ट टाकली तरी त्यावर लाईक्सचा आणि कॉमेंट्सचा पाऊस पडतो. आमच्या पाहण्यातील अशा एका व्यक्तीने त्याच्या घराशेजारी असलेल्या विजेच्या खांबाखाली उभे राहून डोक्यावरील दिव्याच्या उजेडात सेल्फी काढून "फिलिंग हॅप्पी - ऍन इव्हिनिंग इन गोवा" या प्रस्तावनेसह तो फोटो फेसबुकवर टाकला आणि तुडुंब लाईक मिळवले होते. वास्तविक त्या सेल्फीत त्याच्या घराच्या बाहेर दोरीवर वाळत टाकलेला त्याचाच बनियन आमच्या सूक्ष्म नजरेतून सुटला नाही तरीही फेसबुकवरील कॉमेंट्समध्ये "पुणेरी" म्हणावी अशी एकही कॉमेंट्स आढळून आली नाही. ग्रहयोगाचे फलित, दुसरे काय!

या ग्रहयोगावर जन्मलेले लोक संक्रांतीला फेसबुक आणि व्हाट्सअँपवरून तिळगुळ वाटतात आणि तिथेच पतंगदेखील उडवतात, दिवाळीला तिथेच आकाशकंदील लावून उजेड पाडतात, प्रजासत्ताक दिनाला तिथेच झेंडा फडकवितात एवढंच काय संकष्ट चतुर्थीला आणि एकादशीला अनुक्रमे "हॅपी चतुर्थी" आणि "एकादशीच्या शुभेच्छा" असले बिनडोक मेसेज टाकतात आणि तरीदेखील फेमस होतात. एखाद्या ग्रहाचा प्रभाव किती असावा याला काही मर्यादा!!

स्वतःच्या बायकोच्या वाढदिवसाला व्हाट्सअँप डीपी, स्टेटस, फेसबुक असं सारं काही “बायकोमय” करून टाकून हे कमी की काय म्हणून “प्रिये, आणून देतो तुला चांदण्याचा हार” असल्या फळकवणी कविता तिथे टाकणारे लोक हमखासपणे या ग्रहयोगावर जन्मलेले असतात असे आमच्या (अभ्यासपूर्ण इ. इ.) सर्वेक्षणात सिद्ध झाले आहे.

आमचा या विषयावरील अभ्यास पूर्ण होत आला आहे. लवकरच त्याचा शोधनिबंध व्हाट्सअँप आणि फेसबुकवर टाकायच्या विचारात आम्ही आहोत. मात्र आमच्या पोस्टला लाईक किती मिळतील हे आजमावण्यासाठी आमची पत्रिका कोणत्या ज्योतिषाला दाखवावी या विचारात सद्या आम्ही गर्क आहोत.

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

लहानपणापासूनच चप्पल खरेदी करताना एवढा विचार कधी केलाच नव्हता. मुळात नवीन चप्पल खरेदी करायचे प्रसंग फारच कमी यायचे. घरातील कोणत्यातरी सख्ख्या किंवा चुलत भावंडांचे पायताण मोठ्याला बसेनासे झाले की लहान भावंडाला मिळायचे.



## ३. पायताण खरेदीची ओढाताण!

“साहेब, ही जोडी तुम्हाला नाही आवडली ना तर नाव बदलेन" दुकानाच्या मालकांचा आत्मविश्वास वाखाणण्यासारखा होता.

मी निमूटपणे पाय पुढे केले.

गेला अर्धा तास झाला मी एका जागी बसून होतो..... स्वतःच्या पायावर उभी रहायची ताकदही माझ्यात आता शिल्लक नव्हती....... माझा एक पाय मालकांच्या हातात, त्यामुळे त्या पायाला रग लागली होती.... पण बोलायची सोय नव्हती.

प्रत्येक नवीन प्रकारची चप्पल माझ्या एका पायात सरकवली जात होती आणि त्यानंतर एका पायात नवीन चप्पल आणि दुसरा पाय अनवाणी अशा अवतारात पॅन्ट हाताने घोट्यापर्यंत वर ओढत दुकानातील सर्वांना चालून दाखविण्याचे प्रात्यक्षिक व्हायचे!!

“साहेब, ही चप्पल बघा...... विमानाच्या टायरचे सोल आहेत याला, कसं बी वापरा”..... आणखी एक नवीन चप्पल माझ्या एका पायात सरकवत मालक म्हणाले.

मला मनात प्रश्न आला की असे कोणते विमान असेल की ज्याच्या टायरचे सोल करून चप्पलना बसवण्याची वेळ आली असेल. असो ........ ...एखाद्या दिवाळखोर झालेल्या विमान कंपनीचे विमान असेल असा विचार करून मी गप्प राहिलो.

"मालक, विमानाच्या टायरचे सोल लावलेल्या चपलांमुळे मी हवेत तर उडणार नाही ना" मी माझा पाय त्यांच्या हातातून सोडवण्याचा प्रयत्न करता करता विनोद केला.

"साहेब, हा विनोद तुमच्या पुस्तकात खपला असता, पण इथे नाय चालणार" मालकांनी एका वाक्यात मला झटक्यात जमिनीवर आणले.

"साहेब, असा माल नाही मिळणार तुम्हाला दुसऱ्या दुकानात" माझ्या पायात आणखी एक नवी चप्पल सरकवीत मालक म्हणाले.

"चपलांपेक्षा यांना सॅन्डल दाखवा." हिने सुचवले.

"बरोबर आहे वहिनीसाहेब तुमचे! वजन प्रमाणापेक्षा जास्त असलेल्या माणसाचा पाय चपलेत नीट बसत नाही. त्यापेक्षा सॅन्डलमध्ये बक्कल लावून बसवला की फिट्ट बसतो" मालकांनी माझ्या वजनावर विनाकारण टिप्पणी केली.

"वजन वाढेल नाही तर काय होईल! तोंडावर ताबा नसला की असच होणार" हिने तिच्या तोंडावरचा ताबा सोडला.

“भाउसाएब, तुला वजन कमी करायचं असल ना तर सकाली सकाली गरम पाण्यात निंबू पीलून पीत जा... सगला सुपडा साफ होते.” माझ्या शेजारी बसलेल्या आजोबांनी विनाकारण मधे तोंड खुपसले.

“काय सांगता आजोबा! खरं की काय?” हिचा आनंद गगनात मावेना.

“होय बेटा, गेली चालीस सालसे मै रोज निंबू पाणी पिता हू!!”

मग ते निंबूपाणीवाले आजोबा आणि आमची ‘ही’ यांच्यात ' वजन कसे घटवावे ' यावर चर्चासत्र सुरु झाले. दुकानाच्या मालकांनी माझा एक पाय हातात धरून त्या चर्चेत सहभाग घेतला.

पंधरा वीस मिनिटांच्या चर्चेनंतर ‘वजन जास्त असणे तब्येतीसाठी धोकादायक असते’ यावर एकमत झाल्यावर पुन्हा विषय माझ्याकडे आला आणि चपलांपेक्षा सॅडलच मला योग्य आहेत असा बूट निघाला.

“साहेब, दाखवू का मग सॅन्डल?” मालकांनी विचारले.

“दाखवा" – मी.

“मायकल, तो ब्रँडेड सँडल्सचा माल आलाय ना तो टाक.” मालकांनी हुकूम सोडला.

मग तो मायकल दुकानाच्या मधोमध लावलेल्या शिडीवरून माळयावर गेला. अगदी दोन मिनिटात मायकेलने दहा-बारा सॅन्डलचे बॉक्स वरूनच मालकाच्या हातात लीलया टाकले. आणि त्याच्या मालकांनी ते बरोबर झेलले.... या दोघांचे हे कसब मला खूपच आवडतं.

मला एकदा फावल्या वेळात त्या माळयावर जाऊन तिथला स्टॉक बघायची इच्छा आहे. एवढयाशा माळयावरून गिऱ्हाईकाला हवा असलेला माल तो 'मायकल' नामक मुलगा कसा शोधून काढतो हे मला आजवर न सुटलेले कोडे आहे.

मी लहान असताना आमच्या घरातील माळयावर चढून तिथल्या वस्तू काढून देण्याची कामगिरी माझ्याकडे असायची. असंच एकदा कोळशांनी पूर्ण भरलेले पोतं काढण्याचे काम काकाने माझ्याकडे सोपवले होते....... एकतर माळयावरील अंधारात काही दिसत नव्हते.......... त्यात काकाच्या सूचनांचा खालून भडीमार! त्याच्या सोबत आमची आज्जी कमरेवर हात ठेवून "डाव्या बाजूला बघ- उजव्या बाजूला बघ" अशा सूचना देत होती. अंगाचं मुटकुळं करून ते कोळशाचं पोतं शोधताना मला जो घाम फुटला होता ना ते आठवलं तर आजही घाम फुटतो.

मोठ्या प्रयत्नांनंतर शेवटी एकदाचं ते कोळशाचं पोतं सापडलं.... आणि त्यानंतर माळ्यावरून त्या लपलपत्या शिडीवरून उतरताना माझ्यासकट ते पोतं काकाच्या अंगावर पडलं आणि……….. शेजारी उभ्या असलेल्या आज्जीने टुणकन उडी मारत बाजूला जाताजाता म्हणलेले “हात मेल्या” एवढेच शब्द मला आठवत होते.

नंतर ओटीवर वर्तमानपत्र वाचत बसलेले आजोबा आणि माजघरात काम करत असलेला दामू याने प्रथम मला त्यानंतर पोत्याला आणि शेवटी काकाला कसे उचलले होते याच्या रसभरीत कथा पुढे अनेक दिवस घरातील मंडळी येणाऱ्याजाणाऱ्याला सांगत होती. त्यानंतर अनेक दिवस मी काकाच्या आसपास फिरकलो नव्हतो.

इथे मात्र एकावर एक दहा बॉक्स घेऊन शिडी निम्मी उतरत मायकलने एका मागून एक असे सगळे बॉक्स मालकांच्या हातात नेम धरून टाकले.

“हा बघा ऑल सीझनवाला, हा तर एकदम दणकट... तीन वर्षांची कटकट मिटली... किंवा हा जोड एकदा वापरून बघा... आयुष्यभर दुसऱ्या ब्रँडचे नाव घेणार नाही तुम्ही" असे त्याचे

एकामागून एक डायलॉग सुरु होते आणि त्यामुळे माझ्या डोक्यातील गोंधळ वाढत होता.

खरं तर लहानपणापासूनच चप्पल खरेदी करताना एवढा विचार कधी केलाच नव्हता. मुळात नवीन चप्पल खरेदी करायचे प्रसंग फारच कमी यायचे. घरातील कोणत्यातरी सख्ख्या किंवा चुलत भावंडांचे पायताण मोठ्याला बसेनासे झाले की लहान भावंडाला मिळायचे.

आमच्या लहानपणी शाळेच्या रस्त्यावर असलेल्या एकमेव चपलांच्या दुकानाबाहेर प्रचंड मोठ्या आकाराची कोल्हापुरी चप्पल टांगलेली असायची आणि तिला बाजूने लायटिंग वगैरे करून ती सजवलेली असायची. आम्ही पोरं जुन्यापुराण्या चपला पायात घालून पाय ओढत शाळेत जाताना त्या सजवलेल्या चपलेकडे आशाळभूत नजरेने बघत जायचो. आमच्या वर्गातील सदाच्या पायात तशा कोल्हापुरी चपला असायच्या. सगळा वर्ग भरलेला असताना सदा पायातील चपलांचा करssकर आवाज करत वर्गात प्रवेश करायचा आणि मास्तरही त्याला आत यायला वाट करून द्यायचे. सदा वर्गातील एंट्री सदाच अशी घ्यायचा. तो वर्गात गैरहजर असताना आम्ही त्याच्या चालण्याची आणि त्याच्या चपलांच्या आवाजाची नक्कल करायचो.

सदाच्या आणि कोल्हापुरी चपलेचा आठवणीने मी थोडा गहिवरलो. न रहावून मी विचारले,"तुमच्याकडे कोल्हापुरी चप्पल आहेत का?"

माझ्या या प्रश्नावर हसण्यासारखे काही नव्हते. पण आख्खे दुकान हसले.. आमची ही तोंडाला पदर लावून हसली, निंबूपाणीवाले आजोबा हसले, इतर दोनचार गिऱ्हाईके हसली... दुकानाचे मालक हसले आणि ते हसले त्यामुळे मायकलसुद्धा हसला.

"भाउसाएब, तू कोल्लापुरी घालून चालायला लागला ना तर एवढा कार्टून दिसशील ना..." शेजारी बसलेल्या आजोबांच्या या वाक्याने आख्खे दुकान पुन्हा एकदा हास्यकल्लोळात बुडाले.

माझ्या पडलेल्या चेहऱ्याकडे पहात गल्ल्यावर बसलेल्या तरुण मुलाने मध्यस्थी केली. मोठ्या आस्थेने त्याने विचारले, "काका मला सांगा, तुम्हाला कसल्या चप्पल पाहिजेत?"

मला त्या मुलाचा आधार वाटला ...... मी त्याला सांगितले, "हे बघ मला पायाला आरामदायी वाटतील, चालायला सोपे आणि दणकट असं काहीतरी दे."

क्षणार्धात त्याने ऑर्डर दिली, "मायकल, काकांना लोफर दाखव."

मी खुर्चीतून पडायच्या बेतात आलो. माझ्यासारख्या सज्जन माणसाला तो तरुण मुलगा ‘लोफर’ म्हणत होता आणि आमची ही सुद्धा कौतुकाने ते ऐकत होती.

मात्र ‘लोफर’ हा बुटांचा प्रकार आहे हा उलगडा मायकलने लगेच केला आणि पुन्हा एकदा माळ्यावरून लोफरचे दहा बारा बॉक्स टाकले आणि त्याच्या मालकाने सुद्धा “दणकट, ब्रँडेड, तीन वर्षांची काळजी मिटली” ही आधीची टेप पुन्हा वाजवली.

आता माझ्या आजूबाजूला चपला, सॅन्डल आणि बुटांच्या बॉक्सचा एवढा ढीग झाला होता की अजून थोडा वेळ हे असेच चालले असते तर मी त्यामध्ये हरवून गेलो असतो.

प्रसंगाचे गांभीर्य ओळखून मी हिच्याकडे निर्णय सोपवला.

“तुम्ही तरी कधी मॉडर्न (उच्चारी “मॉरडन") होणार” अशी समजूत घालून हिने लोफर शूज घेण्याचे सुचविले आणि ‘ मला लोफर शूज खूप म्हणजे खूप आवडले आहेत’ - असे परस्पर तिनेच जाहीर करून टाकले.

….. मग एकदम भडक रंगाचे आणि विचित्र आकाराचे लोफर शूज इतरांनी माझ्यासाठी निवडले आणि एकदाची ‘पादत्राण खरेदी’ या विषयावर पडदा पडला.

त्या लोफर शूजची किंमत ऐकून माझा चेहरा त्या शूजसारखाच भडक रंगाचा आणि विचित्र आकाराचा झाला पण "आपण आता ठरवलंय ना 'मॉरडन' व्हायचं" अशी समजूत हिने घातली आणि आणि त्या लोफर शुजचे बॉक्स हातात घेऊन आम्ही विजयी मुद्रेने बाहेर पडलो.

दुकानात माझ्या लक्षात आले नाही... पण घरी आल्यावर पायात बूट घातल्यावर लक्षात आले की ते घातल्यावर माझा अवतार अगदीच लोफर दिसत होता......

...

...

.....

सध्या मी भल्या सकाळीच ते लोफर शूज घालून घराबाहेर पडतो आणि संध्याकाळी अंधार पडल्याशिवाय घराकडे परतत नाही.!!!!

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

*बाहेरगावी जाण्यासाठी एसटी पकडण्यासाठी मी त्याच्या रिक्षातून अनेक वेळा घरातून बसस्टँडवर गेलो आहे. आणि प्रत्येक वेळेला त्याच्या संवादाची हीच टेप न कंटाळता ऐकत आलो आहे.*



## ४. रिक्षा.

“आमच्या गुणांची लोकांना कदर नाहीये” त्याने नाराज स्वरात म्हणले.

“बरोबर आहे.” मी त्याला दाद दिली.

"वास्तविक आमचे काम किती अवघड आहे! आणि आमच्यावर मोठी जबाबदारी पण असते.”

“बरोबर आहे. तीन लोकांची जबाबदारी असते तुमच्यावर” मी माफक विनोद केला. त्याने माझ्याकडे दुर्लक्ष केले.

"पण लोकांना आमच्या सेवेची कदर नाहीये!”त्याने खड्डा चुकविण्याचा प्रयत्न करत म्हणले.

“तुमच्या......!!” खड्डा चुकविण्याचा त्याचा प्रयत्न असफल झाल्यामुळे मला नको त्या ठिकाणी खड्ड्याची प्रचिती आली आणि माझे वाक्य अर्धवट राहिले.

“तुम्हीच सांगा साहेब, एवढे खड्डे चुकवायचे म्हणजे सोपे काम आहे का?” त्याने अजून एक खड्डा चुकविण्याचा असफल प्रयत्न केला.

“अजिबात नाही” मी कळवळत म्हणालो.

“आमच्यावर विनोदी गाणी तयार करतात हे पिक्चरवाले” त्याने सुस्कारा टाकत म्हणले.

“मी पिक्चर पहात नाही” मी बचावात्मक उत्तर दिले.

“गाणी लावू का साहेब?” त्याने आदराने विचारले.

माझ्या होकाराला किंवा नकाराला अर्थ नव्हता कारण माझे उत्तर मिळायच्या आधीच त्याने टेपरेकॉर्डरवर कर्कश्श आवाजात गाणी सुरु केली होती. त्या टेंपरेकॉर्डरचे दोन्ही स्पीकर माझ्या दोन्ही कानाच्या अगदी जवळ होते.

“गाणी लावल्यावर कसं शांत वाटतं ना साहेब!” त्याने आनंदाने विचारले.

मला त्याचे बोलणे ऐकू आले नाही तरी आरशात बघून मी मानेनेच "हो" म्हणले.

“माणसाने कसे आंनदात रहावे - या मताचा आहे मी पहिल्यापासून” त्याने चर्चेचा आणि रिक्षाचा गियर बदलला.

“अगदी बरोबर” मी.

“साहेब तुम्ही मला इतके दिवस बघताय, कधी आपण दिसलो का दुःखी ?” त्याने चर्चेचा आणि रिक्षाचा वेग वाढविला.

“च्योउक” मी ' अजिबात नाही ' या अर्थाचे उत्तर दिले.

“आपण बरे आणि आपले काम बरे” त्याने एक जनरल वाक्य टाकले.

उत्तरादाखल मी स्मितहास्य केले.

“पण लोकांचं बघितला ना तुम्ही... आपलं काम करायचं नाही आणि दुसऱ्याला शिव्याशाप द्यायचे..... आता बघा ना हे साले लोक रस्ते घाण करून ठेवतात आणि बिचाऱ्या इतर लोकांना त्याचा त्रास होतो” त्याने तोंडातल्या पानाची रस्त्यावर लांबलचक पिचकारी टाकत सामाजिक विषयाला हात घातला.

“अगदी बरोबर आहे” मी त्याच्या पिचकारीत रस न घेता उत्तर दिले.

खरं तर त्याचा हा संवाद मी गेले कित्येक वर्षे ऐकत आलो आहे. बाहेरगावी जाण्यासाठी एसटी पकडण्यासाठी मी त्याच्या

रिक्षातून अनेक वेळा घरातून बसस्टँडवर गेलो आहे. आणि प्रत्येक वेळेला त्याच्या संवादाची हीच टेप न कंटाळता ऐकत आलो आहे.

“साहेब,इकडच्या पुलावरून घेऊ का? जवळ पडेल” त्याने एक गुगली टाकली. “तुम्हीच ठरवा! तुमच्यावर विश्वास आहे आमचा .... तुम्ही फसवणार नाही.” मी मनाचा मोठेपणा दाखवत म्हणालो. मला माहित होते की मी कोणताही रस्ता सांगितलं तरी तो त्याचेच खरे करणार होता.

माझ्या उत्तराने तो खुशीत आला. त्याने गर्रकन रिक्षा वळवून एका गल्लीतून घातली. त्याची ही सवय मला माहित होती. त्यामुळे रिक्षात बसल्यापासून उतरेपर्यंत मी लहान मुलासारखे आमच्या दोघांमध्ये असलेल्या आडव्या दांडीला घट्ट धरून बसतो.

थोड्या वेळाने त्याने टेपरेकॉर्डर बंद केला आणि स्वतःच एक हिंदी गझल म्हणायला सुरुवात केली. पहाटेच्या वेळी त्याच्या आवाजात गझल ऐकणे म्हणजे अत्याचार होता.

त्याने गाणे थांबवावे म्हणून मी मुद्दामहून म्हणालो,”आवाजात दम आहे तुमच्या!!”

माझा अंदाज बरोबर ठरला.

त्याने गझल गायन थांबवले. दोन क्षण तो आठवणीत रमला.

"साहेब, कॉलेजात असताना ग्यादरिंगमध्ये गाणी म्हणायचो... चिक्कार बक्षिसं मिळवली आहेत. अजूनही घरात ट्रॉफ्या पडल्या आहेत “रिक्षाचा वेग कमी करत तो म्हणाला.

त्याला गाण्यासाठी बक्षिसं देणाऱ्या शिक्षकांना मी मनातूनच हात जोडले.

“ए बैला ........!! तु X X X X” त्याने जोरदार शिवी हासडली.

त्याच्या गाण्याविषयी माझ्या मनातील विचार त्याला कसे कळले असा विचार करून मी घाबरून बघितले ....... त्याचे बोलणे माझ्यासाठी नव्हते तर रस्त्यातून आडवे पळणाऱ्या एका माणसाला उद्देशुन होते.

“बघितलं ना साहेब.... रस्त्यातून कशी अडवीतिडवी पळतात ही लोकं... कशी चालवायची आम्ही रिक्षा?” त्याने मनातील सल बोलून दाखवली.

"अगदी बरोबर आहे" मी 'बरोबर आहे' चा जप सुरु ठेवला.

एवढ्यात सिग्नल आला. आता दोनचार मिनिटांची निश्चिती होती. तेवढ्यात त्याने पुढ्यातील एक झाकण उघडून पिवळे फडकं काढलं आणि काच आतून पुसून घेतली आणि रिक्षात सगळीकडे

फडका 'मारून' घेतला. त्याच्या तसे करण्याने रिक्षा स्वच्छ झाली का खराब झाली - त्यालाच माहित!

हिरवा सिग्नल पडल्यावर त्याने एकदोन गाडयांना चलाखपणे मागे टाकत वेग वाढविला. त्याच्या या कलेचे मला कायमच आकर्षण वाटत आले आहे.. ‘आता धडकणार आपण पुढल्या गाडीला’ असा विचार मनात येऊन भीतीने मी डोळे घट्ट मिटून घेतले की काही सेकंदात तो त्या गाडीला चकवत लीलया पुढे सटकतो.

शेवटी एकदाचे बसस्टँड आले. मी उतरता उतरता त्याने नेहमीचा डायलॉग टाकला,"साहेब,एवढ्या जवळच्या रोडने दुसऱ्या कोणी आणले नसते तुम्हाला.”

“म्हणलं ना मी मघाशीच - आमचा विश्वास आहे तुमच्यावर” - खिशातून पैशाचे पाकीट काढता काढता मी सुद्धा नेहमीचा डायलॉग मारला.

अजून माझी बस यायला वेळ होता. त्यालाही पुढचे गिऱ्हाईक दिसत नव्हते.

“साहेब, नेहमी कुठे जाता तुम्ही यस्टीने?” त्याने माझ्याविषयी प्रथमच प्रश्न विचारला.

“सामाजिक विषयावर व्याख्यानं असतात माझी ठिकठिकाणी... सध्या कोकणात सुरु आहेत व्याख्यानं” मी हरखून उत्तर दिलं.

“व्याख्यान म्हणजे भाषण ना साहेब?”

“हो! व्याख्यान म्हणजे भाषण.... आणि ते सुद्धा सामाजिक विषयावर” मी अभिमानाने सांगितले.

“पण एक विचारू का साहेब?” त्याने डोळे बारीक करत विचारले.

“हो हो, विचारा ना!” मी उत्साहाने म्हणालो.

“या व्याख्यानाचा नक्की काय उपयोग होतो. लोकं सुधारतात का या तुमच्या व्याख्यानामुळे?” त्याने वर्मावर बोट ठेवलं.

उत्तरादाखल मी ओशाळत हसलो.

“चला साहेब.. उशीर होईल तुम्हाला” असे म्हणत त्याने रिक्षात बसून रिक्षा पुन्हा एकदा गर्र्कन वळवली.

* * * * * * * * * * * * * * * * * * * *

ताळेबंदाला इंग्रजीत बॅलन्स-शीट म्हणतात. त्यातील पहिला शब्द ' ताळे ' आणि दुसरा शब्द ' बंद ' आहे . ‘ताळे’ हा शब्द ‘टाळे’ या शब्दा-पासून तयार झाला आहे. इंग्रजीत 'टाळे' या शब्दाला ' लॉक ' म्हणतात. थोडक्यात ज्या वेळी आपण ‘टाळे’ म्हणजे ‘लॉक’ बंद करतो त्यावेळी ‘ताळेबंद’ तयार होतो.



## ५. शंकरची शिकवणी.

“आजच्या कॉलेज शिक्षणात काही अर्थ नाही” मी संतापून म्हणालो.

शंकऱ्याचं रिपोर्ट कार्ड माझ्या हातात होतं. अकरावीच्या पहिल्या सेमिस्टरचे मार्क्स होते त्यात. बाकीच्या विषयांचे ठीक आहे पण अकौंट्समध्ये नापास म्हणजे अवघड होते.

“वाणिज्य शाखेचा आत्मा म्हणजे पुस्तकपालन आणि लेखाकर्म” हे आमच्या अकौंट्सच्या खुरमांडीकर सरांचे वाक्य कानात आजही घुमत असते. याच सरांनी माझी एक जरनल एंट्री चुकली म्हणून माझी वर्गातील एंट्री बंद केली होती …काय मस्त अकौंट्स शिकवायचे सर.. वर्गातील फळ्यावर तीनचार रंगाच्या खडूंनी आखीवरेखीव ताळेबंद काढायचे आणि आम्हा मुलांना तो उतरवून घ्यायला लावायचे. सरांच्या आठवणीत माझी तंद्री लागली.

"फादर, झोप लागली का तुमची ……”शंकऱ्या किंचाळून म्हणाला.

मी दचकून भानावर आलो.

" लवकर सही करून द्या ना रिपोर्ट कार्ड. ….. “शंकऱ्या अत्यंत कोडगेपणाने म्हणाला.

“अरे सही करून द्या म्हणताना लाज वाटत नाही तुला...” माझ्या डोक्यातून अजूनही खुरमांडीकर सर गेले नव्हते.

"पण मार्क्स सरांनी दिले आहेत ना. मी काय करू त्याला" शंकऱ्याने निगरगट्टपणाची हद्द गाठली.

“अरे गाढवा, पण पेपर तू लिहलास ना?” मी रागाने फणफणत म्हणलं.

“इश्श, हे काय बोलणं,…… पेपर विद्यार्थीच लिहतात,… शिक्षक नाही लिहीत” हिने नेहमीप्रमाणे बाष्कळ विनोद करत वातावरण हलकं करायचा प्रयत्न केला.

“हे बघ तू मधेमधे बोलू नकोस …… काय अर्थ आहे का या कॉलेजात आणि त्या शिक्षणात..” मी माझं बेअरिंग सोडलं नाही.

“मग मी उद्यापासून नको जाऊ का कॉलेजात?” शंकर सुद्धा त्याचे बेअरिंग सोडायला तयार नव्हता.

“नको जाऊस …… उद्यापासून कांदे बटाटे विकत बस मंडईत.” मी शक्य तितक्या ओरडून म्हणलं.

“काय बाई बोलणे हे! इतकं काही घालूनपाडून बोलू नका पोराला..”

“मग काय करू? .......... आरती ओवाळू?” मी

“तुम्ही कशाला आरती ओवाळताय त्याची. मीच ओवाळते तुमची. ऑफिसातून आला की त्या मोबाईलमध्ये डोकं घालून बसता ते थोडं कमी करून पोराचा अभ्यास घ्या म्हणलं तर राग येतो तुम्हाला.......... . पन्नास पन्नास व्हाट्सअँप ग्रुपवर तेच ते फालतू जोक पाठवता त्यापेक्षा पोराचे पुस्तक जरा उघडून बघा म्हणलं तर डोक्यात राख घालून घेता लगेच....... " हिने तर माझेच रिपोर्ट कार्ड वाचायला सुरुवात केली.

“अगं पण...!” मी शरणागतीचा सुर लावला.

शंकऱ् मात्र विदाउट तिकीट माणसाला तिकीट चेकरने पकडल्यावर त्याच्याकडे रेल्वेतील इतर लोक जसे पाहतात तसा गालातल्या गालात हसत माझ्याकडे पहात होता.

“काय अगं पण, लग्नाच्या वेळेला तुमच्या मामानी सांगितलं होतं की तुम्ही कॉलेजात अकौंट्समधे कायम पहिले असायचा... किती अभिमान वाटला होता त्यावेळेस मला”- हिने डोळयाला पदर लावून म्हणलं.

तिच्या या वाक्याने मात्र पुढच्या प्रसंगाची नांदी होणार हे लक्षात येऊन मी लगेच विषय बदलला.

“शंकऱ्या, आण तुझे ते अकौंट्सचे पुस्तक! बघतो कसं काय येत नाही तुला अकौंट्स!” मी आवाज चढवून म्हणलं.

“बाई... देवच पावला म्हणायचं.......... बसा तुम्ही बापलेक अभ्यास करत........ मी गरमगरम गोडाचा सांजा करून आणते.” असं म्हणत ही स्वयंपाकघराकडे पळाली.

“फादर, कॉलेजचे अकौंट्सचे पुस्तक मिळाले नाही ….. मी आमच्या अकौंट्सच्या सरांनी लिहून दिलेल्या नोट्स आणू का…?.” शंकर तत्परतेने म्हणाला.

“आण आण …… जे काही आहे ते आण.” मी पण आता इरेला पेटलो होतो.

शंकऱ्याने त्याची सॅक उलगडून त्यातून एक वही काढली आणि त्यातून एक पान उघडून माझ्यापुढे धरले.

मी वाचू लागलो ……………..

ताळेबंदाचे महत्व -

आज आपण ताळेबंदाविषयी माहिती घेणार आहोत. ताळेबंदाला इंग्रजीत बॅलन्स-शीट म्हणतात. ताळेबंद हा शब्द दोन

शब्दापासून तयार झाला आहे. त्यातील पहिला शब्द ' ताळे ' आणि दुसरा शब्द ' बंद ' आहे . ‘ताळे’ हा शब्द ‘टाळे’ या शब्दापासून तयार झाला आहे. इंग्रजीत 'टाळे' या शब्दाला ' लॉक ' म्हणतात. थोडक्यात ज्या वेळी आपण ‘टाळे’ म्हणजे ‘लॉक’ बंद करतो त्यावेळी ‘ताळेबंद’ तयार होतो. या ताळेबंदाचे अनेक उपयोग असतात. तसेच त्याचे अनेक फायदे असतात. याशिवाय त्याचे काही तोटे देखील असतात. काही व्यवसायात ताळेबंद करतात तर काही व्यवसायात ताळेबंद करत नाहीत. ताळेबंद तयार करणे हे अतिशय हुशारीचे काम असते. ताळेबंद तयार करण्याचे काही नियम असतात. काही व्यावसायिक असे नियम पाळून ताळेबंद तयार करतात तर काही लोक त्या नियमांचे पालन न करता ताळेबंद तयार करतात.

थोडक्यात, ताळेबंद हा व्यवसायातील महत्वाचा घटक आहे.

मला शंकऱ्याच्या नोट्स वाचून घेरी आली. शंकर मला गदागदा हलवत म्हणाला “फादर.., पुढल्या पानावर दिलेला होमवर्क वाचा ना. उद्या मला पूर्ण करून द्यायचा आहे क्लासमध्ये.”

मी निमूटपणे वहीचे पुढचे पान उलगडले आणि वाचू लागलो.

होमवर्क

१)निरनिराळ्या व्यक्तींना आणि संस्थांना अनेकविध कारणासाठी ताळेबंदाच्या अभ्यासाची गरज का असते हे उदाहरणासह स्पष्ट करा.

२) एका आंतरराष्ट्रीय कंपनीच्या गेल्या दहा वर्षातील ताळेबंदाचा अभ्यास करून दुसऱ्या एका आंतरराष्ट्रीय कंपनीच्या ताळेबंदाशी तुलनात्मक विश्लेषण करा.

३) "मालाच्या निर्यातीसाठी खेळत्या भांडवलाचा उपयोग निर्यातदार करतो." हे वाक्य ताळेबंदाच्या मदतीने स्पष्ट करा.

४) आपल्या गावातील एका बंद पडलेल्या व्यवसायाच्या मालकाशी 'ताळेबंद' या विषयावर मुलाखत घ्या आणि त्याला सल्ला देणारे दहा मुद्धे लिहा.

५)आंतरराष्ट्रीय वित्तीय अहवाल मानदंड आणि लेखा पद्धती सुधारण्याच्या दिशेने आपले विचार मांडा.

६)' आर्थिक अहवालाची गुणवत्ता वाढविणे आणि सीमापार व्यापार, गुंतवणूक आणि या क्षेत्रातील प्रशासन नियमित करण्यासाठी प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय संस्थांशी संबंध प्रस्थापित करण्याची दिशा ' - या विषयावर एक शोध निबंध लिहा.

मी शंकऱ्याकडे करुण नजरेने पाहिले. तो माझ्या मोबाईलवर गेम खेळत बसला होता. मी स्वयंपाकघराचा कानोसा घेतला …रवा भाजल्याचा मस्त वास येत होता...... मी शंकऱ्याला म्हणलं "आण तुझं रिपोर्ट कार्ड …. सही करतो"

* * * * * * * * * * * * * * * * * *

*“हे पहा, आजच्या जगात फॉरवर्ड जायचे असेल तर काहीतरी फॉरवर्ड करायला हवे.”*

*“म्हणजे नक्की काय करायचे?”*

*”मी ठरवले आहे. शंकरला कथ्थकचा क्लास लावायचा”*



## ६. शंकर जाणार कथ्थकच्या क्लासला!!

शेवटी शंकरला कथ्थकचा क्लास लावायचा हे फायनल झालं. खरं तर त्याला शास्त्रीय गायनाची शिकवणी लावायची माझी खूप इच्छा होती. फुटण्यापूर्वी त्याचा आवाज बरा होता. आमची ही भजनी मंडळातील अभंग घरात गुणगुणायची ते ऐकून शंकऱ्यासुद्धा ती गाणी घरात म्हणायचा ……….. म्युझिक डायरेक्टर रघुवीरकुमार याच्या मार्गदर्शनाखाली तयार झालेले “सुंदर ते ध्यान……. उभे विटेssssवरी…….. करsss कटावरीssss……” हे आधुनिक चालीतील भक्तीगीत शंकऱ्या हावभाव करून म्हणायचा……….. खरं तर रघुवीरकुमारची ही नवी चाल म्हणजे रखुमाई विठ्ठलाच्या कमरेला विळखा घालून गोवा लायनीच्या बोटीत लोक नाचतात त्या गाण्यासारखी होती हे माझे मत आजही ठाम होते पण तरीही शंकऱ्याच्या आवाजात गोडवा होता. त्यामुळेच त्याला शास्त्रीय गायनाची शिकवणी लावावी या मताचा मी होतो.

तसं पाहिलं तर आमच्या घराण्यात सर्वांनाच गाण्याची आवड खूप. आमचे बाबा खुशीत आले की डोक्यावर तेल थापता थापता नाट्यगीते म्हणायचे .......... आमचा दिगंबर काका देवळात कीर्तन करताना भसाड्या आवाजात का होईना पण पदे म्हणायचा........... आणि मला सुद्धा गाण्याची थोडीफार आवड आहेच.

शंकऱ्याला शास्त्रीय गायनाची शिकवणी लावावी असं माझं मत होतं पण आमच्या हिचं एकदम वेगळं मत होतं.

“शास्त्रीय गायन शिकून माझ्या पोराला गावातल्या पोरांसारखं ब्याकवर्ड (उच्चारी ‘ड’ पूर्ण) ठेवायचं नाहीये मला.” ही तणतणत म्हणाली.

हळूहळू ही इतकी पुणेकर झाली होती (हो, आम्ही काही वर्षांपूर्वी पुण्याला शिफ्ट झालो आहोत) की स्वतःचे लहानपण कोकणातल्या छोट्या गावात गेलं आहे हे ती सोयीस्कररीत्या विसरून गेली होती.

“मग काय करायचे ठरवले आहेस तू सुपुत्रांचे!”मी जरा टोचून म्हणजे पुणेरी भाषेत ज्याला खवचटपणाने म्हणतात तसे विचारले.

“हे पहा, आजच्या जगात फॉरवर्ड(पुन्हा उच्चारी ‘ड’ पूर्ण) जायचे असेल तर काहीतरी फॉरवर्ड (पुन्हा तेच) करायला हवे.”

“म्हणजे नक्की काय करायचे?”

“मी ठरवले आहे... शंकरला कथ्थकचा क्लास लावायचा.”

आणि अशा तऱ्हेने शंकरला कथ्थकचा क्लास लावायचा हे सर्वानुमते (!) ठरलं ........ आता पहिला प्रश्न उभा राहिला तो क्लास कोणाकडे लावायचा ......... यावेळी सुद्धा म्युझिक डायरेक्टर रघुवीरकुमार मदतीला धावून आले. त्यांनी प्रो. कुंभकोणम यांचे नाव सुचविले.

“कोथरूडला कुणालाही विचारा कुंभकोणम सरांचे क्लासेस कुठे आहेत ...... खूप प्रसिद्ध आहेत ते!” -इति रघुवीरकुमार.

“पण त्यांचा मोबाईल नंबर...?” मी पुटपुटलो

“ते मोबाईल सारख्या उत्तेजक वस्तू वापरत नाहीत.... त्यांच्या साधनेत व्यत्यय येतो” सखाराम गटणेच्या स्टाईलमध्ये रघुवीरकुमार उत्तरले.

“अरे म्हणजे तुमच्या सारखेच आहेत म्हणा की ते” मी विनोद केला पण रघुवीरकुमारांनी माझ्या विनोदाला एक पुणेकर दुसऱ्या पुणेकराच्या विनोदाला दाद देत नाही तशी अजिबात दाद दिली नाही.

“अगं पण हे दोघेही मोबाईल वापरत नाहीत आणि त्या कुंभकोणमचा पत्ता सुद्धा नीट माहित नाही. ….. कोथरूडला जाऊन कसं शोधायचं त्याला?” मी कुजबुजलो.

“अहो असं काय करताय, ते म्हणतायेत ना -कोणालाही विचारा कोथरूडमध्ये.”

शेवटी आम्ही एके रविवारी दुपारी निगडीपासून कात्रज बसने निघालो. कारण आमच्या घरातून कोथरूडला जायचे म्हणजे बसशिवाय पर्याय नव्हता. त्यात पुण्यातील भयंकर ट्रॅफिक. …… देवाच्या कृपेने कधी नाही ते बसमध्ये बसायला जागा मिळाली होती. साधारणतः एक तासाचा प्रवास होता. मला जरा डुलकी लागली की शंकऱ्या लगेच “फादर, ती बघा नवीन बिल्डिंग” किंवा “फादर, ते बघा मल्टिप्लेक्स” असलं काहीतरी ओरडायचा. जरा डोळ्याला डोळा लागू देत नव्हता.

चांदणी चौकाच्या स्टॉपला उतरल्याउतरल्या शंकरने गुगली टाकली ,”फादर, या चौकाला ‘चांदणी चौक’ हे नाव कसे पडले?”

मी त्याच्याकडे साफ दुर्लक्ष केले.

शेवटी एकदा कोथरूडला आम्ही पोचलो आणि रणरणत्या उन्हात प्रो कुंभकोणमचा पत्ता शोधू लागलो …… कोथरूडच्या त्या मुख्य रस्त्यावर मेट्रोचे काम सुरु होते त्यामुळे आधीच ट्रॅफिक जॅम असलेला रस्ता आणखीनच गर्दीचा झाला होता ……….. भर उन्हात शंकऱ्याची पुस्तकी जिज्ञासा जागृत झाली होती. "फादर, मेट्रोचा उपयोग काय?" इथपासून "मेट्रोचा स्पीड किती असतो?" इथपर्यंत प्रश्न विचारून झाले होते. मी उत्तरादाखल फक्त मान डोलवत होतो आणि त्याला रस्त्याने ओढत घेऊन चाललो होतो. त्या कुंभकोणमला कोणीही ओळखत नव्हतं कोथरूडमध्ये!

"अगं पण नुसतं कुंभकोणमचे क्लास असं सांगून कसं सापडेल? बाकी काहीतरी माहिती नको का?" मी वैतागून म्हणालो.

"अहो असं काय करताय, रघुवीरकुमार म्हणाले आहेत ना की कोणालाही विचार कोथरूडमध्ये …….. ते बघा समोरून येणारे आजोबा ओळखीचे वाटताहेत. त्यांनाच विचारू."

खरंतर ते आजोबा ओळखीचे –बिळखीचे काही वाटत नव्हते पण पुन्हा वादात न शिरता सरळ त्या आजोबांना जाऊन नमस्कार केला.

"नमस्कार." - मी

“ओहोहोहो, नमस्कार नमस्कार, अरे वा, आज सहकुटुंब इकडे कोथरूडला.” आजोबांनी अंदाजपंचे बोलायला सुरुवात केली.

“हो, मुलाला कथ्थकचा क्लास लावायचा होता.” मी

“अरे वा, हे तुमचे चिरंजीव आणि कन्या ना? किती दिवसांनी पाहतोय” शंकर आणि शरयूकडे पहात आजोबा उद्गारले.

शरयूच्या डोळयावर झोप आली होती आणि शंकरचे आजोबांकडे अजिबात लक्ष नव्हते. तो मेट्रोचे काम पाहण्यात दंग होता.

“बाळ..... नाव काय तुझे?” आजोबांनी प्रेमानी विचारले.

“हर्क्युलस”

शंकरच्या उत्तराने आजोबा दचकले.

ही पटकन पुढे आली आणि म्हणाली, “त्याचे नाव शंकर. कॉलेजात जातो. मेट्रोची आवड आहे त्याला... त्यामुळे निरीक्षण सुरु आहे त्याचे... आम्हाला कोथरूडमधील प्रो. कुंभकोणम यांचे कथ्थक क्लासेसमध्ये जायचे आहे.”

“प्रो कुंभकोणम?” आजोबांनी डोळे बारीक करून डोक्याला ताण देत विचारले.

“हो... हो... तेच ते...” ही अधीरतेने म्हणाली.

“गाण्याचे क्लासेस?” पुन्हा बारीक डोळे आणि डोक्याला ताण!!!

“गाण्याचे नाही कथ्थकचे क्लासेस!” हिने चुकीची दुरुस्ती केली.

“हो हो... माझ्या शेजारीच आहे तो शिकवणीचा क्लास....! सुगम संगीत शिकवतात ना ते?” आजोबांची गाडी गाण्यातच अडकली होती.

“सुगम संगीत नाही.... कथ्थक” पुन्हा एकदा चुकीची दुरुस्ती.

“तेच ते, माझ्या शेजारी आहेत ते क्लास!!! काय बरं त्यांचे नाव?” पुन्हा बा. डो. आणि डो. ता.

“कुंभकोणम?” ही अगदीच अधीर झाली होती.

“कोण कोणम?” बा. डो. ... डो. ता.

“कुंभ…!!!” ही

“भाऊसाहेब तुमची रास कोणती?” आजोबांनी माझ्याकडे बघत गाडी दुसऱ्याच रुळावर नेली.

“वृषभ” मी.

“तुमच्याकडे बघून वाटलेच मला!!” – आजोबा.

“म्हणजे, काय म्हणायचे आहे तुम्हाला!!!” डोक्यावर तावलेले ऊन माझ्या आवाजातून प्रकट झाले.

“तसे नव्हे हो भाऊसाहेब... आजच सकाळी वर्तमानपत्रात वृषभ राशीचे भविष्य वाचले होते - प्रवास टाळावेत. ह्यॅ... ह्यॅ.... ह्यॅ” आजोबा.

“फादर, इथला मेट्रो प्रवास कधी सुरु होणार?” शंकर.

“आजोबांना विचार. त्यांना सगळ्या प्रवासाचे भविष्य माहित आहे” मी सुद्धा ह्यॅ ह्यॅ ह्यॅ करत म्हणलं.

“माहीत आहेत का तुम्हाला प्रो. कुंभकोणम यांचे क्लासेस?” हिने पुन्हा गाडी रुळावर आणली.

“अहो, ते काय कोथरूडमध्ये कोणालाही विचारा.... इथे सगळ्यांना सगळं माहित असतं” आजोबांनी जाताजाता आम्हाला ज्ञानामृत दिले.

थोडं पुढे गेल्यावर एका दुकानात आम्ही पत्ता विचारला. त्यांनी ईशान्य दिशेला जायला सांगितले. ..... आता ईशान्य दिशा नक्की कुठे यावर आमच्यात थोडे घरगुती भांडण झाले... शेवटी ही म्हणेल ती ईशान्य दिशा असे मान्य करून आम्ही सगळे हिच्या मागे चालू लागलो. थोड्या वेळात आम्ही ईशान्य दिशेला जात

नसून वायव्य दिशेला जात आहोत असा साक्षात्कार झाला... मग पुन्हा एकदा भर रस्त्यात घरगुती भांडणाचा एक छोटा कार्यक्रम झाला...!!

इतक्यात शंकरला मस्तानी आणि कोल्ड्रिंकचे दुकान दिसले. माझेही डोके तापले होते. आम्ही टू- बाय - फोर (स्मॉल ग्लास) अशी पोटभर मस्तानी प्यालो. छोटी शरयू सुद्धा थोडी तरतरीत झाली. दुकानदार एकदमच सज्जन होता. त्याने विचारपूस केली आणि इथेच आतल्या बोळातील अपार्टमेंटमधील तळमजल्यावर क्लासेस आहेत अशी माहिती दिली.

आम्ही त्याचे आभार मानून पळतच त्या अपार्टमेंटकडे धाव घेतली..... अपार्टमेंटच्या तळमजल्यावरच असलेला क्लासचा बोर्ड लांबूनच दिसला.. पण तिथे दरवाजावर कागदावर काहीतरी लिहून चिकटवले होते. आम्ही जवळ जाऊन तो कागद वाचण्याचा प्रयत्न केला... त्यावर लिहले होते, -- प्रो कुंभकोणम यांचे कथ्थकचे क्लासेस या महिन्यापासून बंद होत आहेत. त्याऐवजी त्यांचे धाकटे बंधू प्रो. शुंभशोनम यांचे शास्त्रीय गायनाचे क्लासेस सुरु होत आहेत. शास्त्रीय गायनाची आवड असलेल्या विद्यार्थ्यांनी खालील क्रमांकावर फोन करावा.

हे ऐकून माझा चेहराच पडला …………..... मी हताशपणे हिच्याकडे पाहिले तर ही म्हणाली, “रघुवीरकुमार म्हणतच होते …... मास्टर शंकरचा गळा चांगला आहे... त्याला शास्त्रीय गायनाचा क्लास सुरु करा म्हणून!”

मी तिचे पुढचे बोलणे ऐकले नाही..

* * * * * * * * * * * * * * * *

# धोंडोपंतांना कॉलेजचे निमंत्रण

२।

दिनांक - - -

प्रिय धोंडोपंत,

आपला पाल्य कु. शंकर आमच्या महाविद्यालयात

. . . आपल्या प्रतिसादाची वाट पहात आहे.

आपली

सरोज खरे

## ७. ' धोंडोपंतांना आले कॉलेजचे निमंत्रण '

“आमच्या कॉलेजात बोलवलंय तुम्हाला फादर, "........... शंकरने माझ्या डोळ्यापुढे, जणू काय तो माझ्या अटकेचे समन्स घेऊन आला होता, अशा प्रकारे कागद नाचवला.

एक तर मला पेपर वाचताना असं मधे कोणी काही आणलं तर प्रचंड संताप येतो.... आमच्या हिला याची फार सवय!

‘ आंतरराष्ट्रीय स्तरावर कच्च्या तेलाच्या किंमती कशा वाढत आहेत ‘ - ही बातमी मी वाचत असतो....... आणि नेमक्या अशा वेळी ही डोळ्यासमोर किराणासामानाच्या बिलाचा कागद नाचवत म्हणते, “पाहिलं का तुम्ही, किती महागाई झाली आहे!”

किंवा ‘ इराण-अमेरिका संघर्ष उफाळून येण्याची शक्यता ‘- याविषयीचा अग्रलेख मी वाचत असतो अशा वेळी आमची ही माझ्या डोळ्यासमोर तिचा मोबाईल आणत चाळीतील व्हाट्सअँप ग्रुपवर बर्वे काकूंचा आणि पावशे काकूंचा संघर्ष कसा उफाळून आला आहे हे दाखवते.

आत्ताही तसेच झाले...... ऑफिसातून नुकताच येऊन पेपर वाचत बसलो होतो........ शंकर अजून कॉलेजातून यायचा

होता..... शरयू तिच्या मैत्रिणींकडे गेली होती आणि हीचे स्वयंपाकघरात काहीतरी सुरु होते.

थोडक्यात घरात शांतता होती.

बऱ्याच दिवसांनी हा योग आला होता.

ही संधी साधून मी वर्तमानपत्रात आलेला ‘ एकविसाव्या शतकातील टेक्नोसॅव्ही जगातील मुलांचे भावविश्व’ - हा लेख समजून घेण्याचा प्रयत्न करत होतो.

खरं तर मला आधुनिक मुलांविषयी लेख समजत नाहीत आणि त्यातील भाषा तर अजिबात लक्षात येत नाही. तरीदेखील “तुम्हाला ना मुलांच्या भवितव्याविषयी काडीची चिंता नाही” या हिच्या वाक्यामुळे मी तो लेख समजून घेण्याचा प्रयत्न करत होतो. त्यातील पहिल्याच वाक्याला मी बराच वेळ अडकलो होतो आणि त्यातील शब्द दातात अडकलेल्या बडीशेपच्या कणासारखा त्रास देत होते.

लेखातील पहिले वाक्य पुढीलप्रमाणे होते -

'एकविसाव्या शतकातील तरुण मुलांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी आपण एक होऊन पृथ्वीवर एकसंघ राज्य निर्माण करायला हवे म्हणजेच जगभरातील मुलांच्या कल्याणाचा ध्यास घेऊन मार्क्सच्या सामाजिक बदलाचा खरा अन्वय आपण लक्षात

घेऊन जगात दिसून येणारी शस्त्र स्पर्धा, सत्ता स्पर्धा, भांडवलदारांचा अकारण द्वेष, शिक्षणाच्या नावाखाली चालणारा हैदोस इत्यादिस पायबंद घालू शकतो '.

डॉ. शामल शेरतुकडे नावाच्या लेखिकेचा हा लेख होता. मी त्या मोठ्या वाक्याचे छोटे तुकडे करून ते समजून घेण्याचा प्रयत्न करत होतो तेवढ्यात शंकर आला.

“आमच्या कॉलेजात बोलवलंय तुम्हाला फादर” शंकरने तेच वाक्य रिपीट केलं.

“हो हो शंकऱ्या.... ऐकू आलंय मला... मी काही बहिरा नाहीये.” मी हातातील वर्तमानपत्र आपटत म्हणलं.

“जरा कुठे वर्तमानात डोकं घातलं की आलाच हा मधेमधे” – मी.

“इश्श, वर्तमानात कसलं डोकं घालताय... वर्तमानपत्रात म्हणा.” ही अंगावर बांधलेल्या पांढऱ्या फडक्याला हात पुसत स्वयंपाकघरातून दिवाणखान्यात येत म्हणाली.

“ते कळतंय मला... आणि हे अंगावर कसलं पांढरं फडकं बांधलयस तू” मी फणफणत म्हणलं.

“अहो हे फडकं नाही किचन एप्रन म्हणतात त्याला… स्वयपांकघरातील घाण अंगावर उडू नये म्हणून वापरायचं असतं ते” ही त्या फडक्याला हात पुसायचे प्रात्यक्षिक दाखवत म्हणाली.

तिच्या या दाव्यावर माझ्याकडे उत्तर होतं पण विषयांतर नको म्हणून मी शंकरकडे मोर्चा वळवला.

“कशाला बोलावले आहे मला तुझ्या कॉलेजात?”

“तेच सांगतोय फादर! हे लेटर वाचा म्हणजे अंडरस्टॅंड होईल तुम्हाला” शंकरने पुन्हा माझ्या डोळ्यासमोर कागद नाचवला.

“दे इकडे ते पत्र! आणि हे बघ शंकऱ्या, माझ्याशी बोलताना इंग्रजी शब्द वापरत नको जाऊस… आणि मला परत फादर म्हणालास ना तर तंगडं तोडीन” पत्र उघडता उघडता मी शंकऱ्याला झापले.

“ओक्के फादर” आईच्यामागे दडत शंकऱ्या पुटपुटला.

त्याच्याकडे दुर्लक्ष करत मी मोठ्या आवाजात पत्र वाचायला सुरुवात केली.

प्रिय धोंडोपंत, (मी चष्म्यातून हळूच हिच्याकडे पाहिले . हिचे लक्ष नव्हते.)

आपला पाल्य कु शंकर आमच्या महाविद्यालयात कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षण घेत आहे. आमच्या महाविद्यालयातील शिक्षकांच्या पुढाकाराने “तरुण मुलांना समजून घेताना..” या परिसंवादात कु शंकरचे पालक म्हणून आपली निवड झाली आहे तरी त्याला आपण हजर रहावे ही विनंती. कार्यक्रमाची वेळ आणि दिवस आपल्याला आपल्या पाल्याकडून कळेलच.

आपल्या प्रतिसादाची वाट पहात आहे (मी पुन्हा एकदा हिच्याकडे पाहिले. आत्तासुद्धा हिचे लक्ष नव्हते.)

कळावे

आपली<br>
सरोज खरे<br>
(वर्ग शिक्षिका, अकरावी क)

मी त्या पत्राची घडी करून शंकरकडे देत विचारले, “आता हे काय नवीन? काहीतरी उद्योग केलेला दिसतोयस कॉलेजमध्ये.”

“अहो, कधीतरी चांगला विचार करा..... एवढं पुढारी म्हणून बोलावलंय तर जावा की.”

"अगं पुढारी म्हणून नाही बोलावले.... शिक्षकांच्या पुढाकाराने आयोजीत केलेल्या कार्यक्रमात बोलावले आहे... जरा नीट ऐकत जा ना" मी वैतागून म्हणलं.

"अहो पण बोलावले आहे ना एवढं आग्रहानं. बाळ शंकर…, येतील रे हे नक्की तुझ्या कॉलेजात" हिने चर्चेला पूर्णविराम दिला.

त्या पत्राने आमच्या घरातील वातावरणच बदलून गेले.

घरातील प्रत्येकजण मला परिसंवादाविषयी सल्ला देऊ लागला.

शंकरने तर कॉलेजात होणाऱ्या परिसंवादाची मॉक टेस्ट घ्यायला सुरुवात केली.

स्वयपांकघरातील डायनींग टेबलावर माझी ही मॉक टेस्ट चालायची. सरोज खरे मॅडमचा रोल अर्थातच आमच्या हिच्याकडे आला, शंकर कॉलेजचा प्रिन्सिपल झाला तर धाकटी शरयू व्हाईस-प्रिन्सिपल अर्थात उपमुख्याध्यापिका झाली. मला आठवतंय आम्ही शाळेत असताना आमचा एक टग्या मित्र व्हाईस प्रिन्सिपलना 'वाईच प्रिन्सिपल' म्हणायचा. त्याच्या मते प्रिन्सिपल शाळेत नसतानाच अगदी थोड्या काळासाठी या व्हाईस प्रिन्सिपलना अधिकार प्राप्त होतो आणि अगदी थोड्या काळासाठी तो प्रिन्सिपल असतो म्हणून ' वाईच ' प्रिन्सिपल! असो.

तर काय सांगत होतो... आमच्या स्वयंपाकघरातील डायनींग टेबलवर दररोज मॉक टेस्ट सुरु झाल्या. पहिल्याच दिवशी डायनींग टेबलच्या एका कोपऱ्यातील खुर्चीत मला बसवलं गेलं,बाकीचे तिघे त्यांच्या खुर्च्यात बसले (एकूण चारच खुर्च्या आहेत आमच्या घरात) आणि माझी उलटतपासणी सुरु झाली. मी बोलावे कसे, हसावे कसे, प्रतिक्रीया कशी द्यावी याविषयी प्रत्येकजण मला सल्ला देऊ लागला.

त्यातही शंकर -शरयूचे माझ्या देहबोलीकडे अधिक लक्ष.

“फादर, तुम्ही हात टेबलवर ठेवा” इति शंकर.

“बाबा, खुर्चीत बसल्यावर तुम्ही पाय सारखे हलवू नका” इति शरयू.

मुलांचे एक ठीक आहे पण हिने सुद्धा सूचना द्यायला सुरुवात केली,”खुर्चीत बसताना पोक काढून बसू नका”

मी स्वतःच्या मनाला शांत बसण्याची ताकीद देऊन तिघांच्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करत होतो. त्याचे कारणही तसेच होते. मी मनातून या परिसंवादाच्या भानगडीला घाबरलो होतो. टीव्हीवर पाहतो ना मी रोज परिसंवाद. कोणत्यातरी विषयावर वेगवेगळ्या टोकाची मते असलेल्या व्यक्ती ज्वलंत विषयावर त्यापेक्षाही ज्वलंत अशी चर्चा करत असतात.

त्यातून हा शंकऱ्याच्या कॉलेजातील परिसंवाद. एवढ्या सगळ्या पोरांमधून शंकऱ्याची आणि पर्यायाने माझी त्यासाठी का निवड झाली असेल याचे मला कोडे पडले होते.

मुळात कोणत्याही विषयात माझे स्वतःचे असे मत नसते. माझ्याशी बोलणाऱ्या प्रत्येक माणसाचे बोलणे मला पटते त्यामुळे त्याच्यावर पुन्हा वाद घालून स्वतःचे मत मांडायचा प्रश्नच येत नाही.

आणि मला हेच कळत नाही की हे कॉलेजातील लोक तरी पालकांना बोलावून कशाला घेतात! आमचा शंकर अभ्यासात थोडा कच्चा आहे हे मी नेहमीच मान्य करतो पण म्हणून काय अशा मुलांच्या पालकांना डायरेक्ट कॉलेजात बोलवून परिसंवादांत भाग घ्यायला लावायचं!

मी कॉलेजात असताना माझी अभ्यासातील प्रगती साधारणतः शंकर सारखीच होती पण म्हणून काही आमच्या दामले मास्तरांनी आमच्या वडिलांना कधी कॉलेजात बोलावून घेतलं नाही.

दामले मास्तर आमचे क्लास-टीचर होते आणि अर्थशास्त्र शिकवायचे. त्यांची वर्ग घ्यायची पद्धत अफलातूनच होती. संपूर्ण वर्गाला त्यांच्या रोल नम्बरप्रमाणे बाकांवर बसायला सांगायचे.

म्हणजे पहिल्या बाकावर रोल क्रमांक एक असलेला विदयार्थी, त्याच्या शेजारी रोल नंबर दोन असलेला विद्यार्थी असे...! वर्गात शिरल्याशिरल्या ते सर्वांना रोल नंबरप्रमाणे बसायला सांगायचे आणि नंतरच वर्ग सुरु करायचे. प्रश्न उत्तर सुरु झाली की ते रोल नंबरचा पुकारा करत विद्यार्थ्याला उभे करायचे.

साधारणतः त्यांचा वर्ग पुढील प्रमाणे चालायचा :

“रोल नंबर अठ्ठावीस उभा रहा आणि अर्थशास्त्राचा अर्थ सांग.”

मग रोल नंबर अठ्ठावीस उभा रहायचा आणि अर्थशास्त्राच्या अर्थाचा अनर्थ करायचा.

माझा रोल नंबर सतरा होता. वर्षभर त्यांनी वर्गात आणि वर्गाबाहेर मला - “रोल नंबर सतरा” याच नावाने हाक मारली. त्यांची हाक मारायची पध्द्त सुद्धा अशी होती की ‘रोल नंबर सतरा’ ऐवजी ‘कैदी नंबर सतरा’ असंच ऐकू यायचं.

अशाच एका लेक्चरला त्यांनी मला उभे केले.

“रोल नंबर सतरा, उभा रहा आणि रिझर्व्ह बँकेचे सर्वात महत्वाचे काम सांग.”

मी थरथरत उभा राहिलो. मला उत्तर येत नव्हते.

मी मदतीसाठी शेजारी बसलेल्या बाळूकडे (रोल नंबर अठरा!!) पाहिले पण तो मान खाली घालून बसला होता. माझी चुळबुळ बघून दामले मास्तर पुन्हा कडाडले "रोल नंबर सतरा... बहिरा झालास का... रिझर्व्ह बँकेचे सर्वात महत्वाचे काम सांग."

माझ्या बुद्धीला ताण देऊन मी उत्तर दिले, "देशातील बँकांच्या सुट्ट्यांची यादी जाहीर करणे हे रिझर्व्ह बँकेचे सर्वात महत्त्वाचे काम असते."

माझ्या उत्तराने बाळूसहित सगळा वर्ग खोखो हसला होता.

दामले मास्तर तर असे संतापले होते की जणू काही माझ्या उत्तराने देशाची बँकिंग व्यवस्था कोलमडली होती आणि सरकारने त्यासाठी दामले मास्तरांना जबाबदार धरले होते.

खरं तर मी दिलेल्या उत्तराचाच मला पुढील आयुष्यात उपयोग झाला. पण मास्तरांचं मत वेगळंच असायचं.

संतापून मास्तरांनी मला पुढे बोलावले, "रोल नंबर सतरा पुढे ये."

मी पाय ओढत पुढे गेलो.

मास्तरांनी मला सांगितले, "रोल नंबर सतरा... म्हण माझ्यामागे - रिझर्व्ह बँकेचे सर्वात महत्वाचे काम म्हणजे पतधोरण ठरवणे"

माझी घाबरगुंडी उडाली होती त्यामुळे मी ‘पतधोरण’ ऐवजी ‘पत्रधोरण’ म्हणालो आणि पुन्हा एकदा सगळा वर्ग खोखो हसला आणि दामले मास्तर पुन्हा एका संतापून लालबुंद झाले.

थोड्याफार फरकाने असा प्रसंग वर्गातील प्रत्येक रोलनंबरवर यायचा.. पण म्हणून काही मास्तरांनी आमच्या पालकांना कॉलेजात नाही बोलावून घेतलं.

जे काही वाद असायचे ते आम्ही आणि दामले मास्तर यांच्यात... त्याचे पडसाद घरापर्यंत कधीच उमटायचे नाहीत.

हेच दामले मास्तर रिटायर्ड झाल्यानंतर एकदा बँकेच्या एटीएमबाहेर गोंधळलेल्या स्थितीत उभे होते. मी आणि बाळू नेमकं त्यावेळी तिथून चाललो होतो. मास्तरांना पाहून आम्ही थांबलो. मास्तरांना एटीएममधून पैसे काढायचे होते. त्यांचा मुलगा बाहेरगावी गेल्यामुळे हे काम त्यांच्याकडे आले होते. मी आणि बाळूने त्यांना त्यावेळी पैसे काढायला मदत केली होती. बाळू माझ्या कानात कुजबुजला होता,”मास्तरांना विचार ना, लोकांना एटीएममधून पैसे काढून देणे हे रिझर्व्ह बँकेचे काम आहे का?” मी बाळूकडे दुर्लक्ष केले होते.

थोडक्यात, आम्ही विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यातील वादविवाद एका ठराविक पातळीपर्यंतच ताणले जायचे.... त्यात आम्ही पालकांना कधीच सहभागी करून घेतले नाही.

“अहो फादर, झोप लागली का तुम्हाला …… आपली मॉक टेस्ट अर्धीच राहिली.” शंकऱ्या खुर्ची गदागदा हलवत होता त्यामुळे माझी तंद्री भंग पावली..... आणि पुन्हा एकदा आमची मॉक टेस्ट सुरु झाली.

....... अशा एकामागून एक टेस्ट होऊन त्याची अगदी ' टेस्ट सिरीज ' झाली आणि आमची तयारी पूर्ण होईपर्यंत परिसंवादाची तारिख अगदी जवळ येऊन ठेपली.

* * * * * * * * * * * * * * * * * * *

केवढे मोठ्ठे सभागृह होते ते! स्टेजवर सहासात खुर्च्या मांडल्या होत्या. मागे गडद रंगाचा मोठा पडदा होता आणि त्यावर आजच्या परिसंवादाचा छान फलक होता.



## ८. शंकरने दिला सुखद धक्का

शंकरच्या कॉलेजातील होऊ घातलेला आणि आमच्या घरात गेले कित्येक दिवस गाजत असलेला “तरुण मुलांना समजून घेताना ' या परिसंवादाचा दिवस शेवटी उगवला.

मला या परिसंवादाला कु. शंकरचा पालक म्हणून निमंत्रण आले होते तेव्हापासून आमची लगबग सुरु होती. ऑफिसातून घरी आल्यावर मला खुर्चीत बसवून वेगवेगळया प्रकारे प्रश्न विचारून माझी तयारी करून घेण्याची कामगिरी आमची ही, शंकर आणि शरयू घेत होते. तरी देखील या क्षेत्रातील कोणातरी जाणकार माणसाचा सल्ला घ्यावा यावर घरातील सर्वांचे एकमत झाले.

माझ्या माहितीपैकी या क्षेत्रातील एकमेव जाणकार माणूस म्हणजे नानू सरंजामे. या परिसवांदाविषयी मी त्याचे मत जाणून घेण्याचा प्रयत्न केला.

“ए देखिये साब,परिसंवाद याने दो या अधिक व्यक्तियों में किसी बात, विषय आदि के संबंध में होनेवाला तर्कसंगत या विचारपूर्ण वादविवाद” अंगात गुलबक्षी रंगाचा सदरा आणि

डोळ्यावर मोठा गॉगल असा अवतार असलेला नानू ऑर्केस्ट्राच्या पुढे एक मनुष्य हाताच्या हालचाली करतो तशा हालचाली करत माझ्याशी बोलायला लागला.

“अरे पण मी काय बोलायचे तिथे?” मी मूळ मुद्द्याला विषयाला हात घातला.

“ए देखो धोंडोपंत”

“नानू प्लिज मराठीत बोलशील का?” मी अक्षरशः हात जोडत नानूला विनवणी केली.

“ओके, ओके, उस्का क्या है... सॉरी.. सॉरी... त्याचं काय आहे धोंडोपंत, तुमच्या मनात त्या विषयासंदर्भात जे जे येईल ते ते बिनधास्त बोलायचं!” नानूने नेमक्या शब्दात सांगितले.

“अच्छा... अच्छा.... म्हणजे आपल्या परीने संवाद साधायचे ठिकाण म्हणजे परिसंवाद!” मी शाब्दिक विनोद केला पण नानू त्यावर अजिबात हसला नाही.

“एक लक्षात ठेवा धोंडोपंत, तुमचा चिरंजीव तुम्हाला ऑब्झर्व्ह करत असणार आहे तुमचे बोलणे... त्यामुळे तुम्ही जबाबदारीने बोलले पाहिजे परिसंवादात” नानूने विषयाला भलतेच वळण दिले.

एका अर्थाने नानूने मला माझ्या जबाबदारीचे भान करून दिले. खरं तर मी मनातून थोडा घाबरलोच होतो. शंकऱ्याचे घरातील आणि चाळीतील वाढते प्रताप पाहून त्या परिसंवादात होणाऱ्या नाचक्कीचा अंदाज आला होता. त्यामुळे तिथे त्यावेळी तोंड लपविण्यासाठी नक्की काय बोलावे यासाठी नानूकडून मला मदत हवी होती पण नानूने चर्चा वेगळ्याच वळणाने नेली. शेवटी मनाचा हिय्या करून मी परिसंवादासाठी तयार झालो.

आणि शेवटी एकदा तो परिसंवादाचा दिवस आला.

खास या दिवसासाठी हिने शंकऱ्यासोबत जाऊन माझ्यासाठी खरेदी केलेला नवीन स्काय ब्ल्यू रंगाचा शर्ट घातला होता. एरवी माझे बुशकोट आणि विजारी म्हणजे मळखाऊ डिपार्टमेंट हे तुम्हाला माहीतच आहे.

दिलेल्या वेळेआधी अर्धा तास आम्ही कॉलेजात पोचलो. शंकरने आम्हाला थेट कॉलेजच्या सभागृहाकडे नेले.

केवढे मोठ्ठे सभागृह होते ते! स्टेजवर सहासात खुर्च्या मांडल्या होत्या. मागे गडद रंगाचा मोठा पडदा होता आणि त्यावर आजच्या परिसंवादाचा छान फलक होता.

तिथे कॉलेजच्या प्रिन्सिपल, इतर शिक्षक आणि मुले उपस्थित होती.

लगेचच कार्यक्रमाला सुरुवात झाली.

उपस्थित लोकांचे स्वागत शंकरच्या वर्गशिक्षिका सरोज खरे यांनी केले.

त्यानंतर या कार्यक्रमा मागची भूमिका एका शिक्षकांनी त्यांच्या भाषणात सांगितली.

त्यानंतर प्रिन्सिपल मॅडमचे भाषण होते. त्यांनी परिसंवादाचे महत्व विशद (त्यांचाच शब्द) केले. आजच्या काळात पालक आणि मुलांमधील संवाद कसा कमी झाला आहे आणि त्याला पालक कसे जबाबदार आहेत हे सुद्धा त्यांनी विशद केले... पालकांनी मुलांचे भावविश्व् समजून घ्यावे असे आवाहनही त्यांनी केले. (म्हणजे नक्की काय करायचे हे मला कळले नाही.. असो!)

प्रिन्सिपल मॅडमच्या भाषणातील प्रत्येक वाक्य माझ्यासाठीच आहे असे मला वाटत होते..... आणि त्या एवढ्या मोठ्या सभागृहात त्या माझ्याकडेच पाहून भाषण करत होत्या असे वाटत होते..... आजूबाजूचा काळोख, डोक्यावर फिरणारा पंखा आणि या सर्वांपेक्षाही न कळणारी भाषणे आणि मान्यवरांची मनोगते यामुळे मला कधी झोप लागली हे कळलंच नाही. झोपेत स्वप्न पडले. पालकांचा वर्ग भरला आहे, प्रिन्सिपल मॅडम वर्ग घेत आहेत आणि प्रत्येक पालकाला पुढे बोलावून काही प्रश्न विचारत आहेत . माझा

नंबर आला तेव्हा मला एकाही प्रश्नाचे उत्तर न आल्यामुळे त्यांनी अंगठे धरायची शिक्षा दिली आहे. एवढ्यात शाळेचा शिपाई आला आणि त्याने माझ्या नावाचा पुकारा केला, “श्रीयुत धोंडोपंत जोशी.... श्रीयुत धोंडोपंत जोशी” मला कोणीतरी धक्के देतंय असं वाटलं... झोपेतून जागा झालो तर आमची ही माझा खांदा गदागदा हलवत म्हणत होती, “अहो, तुम्हाला बोलवतायत पुढे” मी डोळे चोळत जागा झालो तर खरंच स्टेजवरून माझ्या नावाचा पुकारा सुरु होता. खुर्चीतून उठून उभा राहिलो तर कॉलेजातील दोन मुले मला माझ्या खुर्चीतून स्टेजपर्यंत घेऊन जाण्यासाठी आली होती. मोठ्या आदबीने त्या दोघांनी मला स्टेजवर नेले. तिथेसुद्धा माझी ख्रुची दाखवून मला बसण्याची विनंती केली. माझ्यासाठी हे सारेच नवीन होते. मी खुर्चीत बसता बसता पुढे पाहिले. सभागृह खचाखच भरले होते. माझ्या आजूबाजूच्या खुर्च्यांवर वेगवेगळे लोक बसले होते. आळीपाळीने मी सर्वांकडे पाहून घेतले, एकही ओळखीचा नव्हता, मात्र साता जन्माची ओळख असल्यासारखे प्रत्येकाने माझ्याकडे पाहून स्मितहास्य केले. माझ्या छातीतील धडधड वाढली होती.

निवेदकाने सुरुवात केली, “श्रोतेहो आपण सर्व तज्ञ व्यक्तींची मनोगते ऐकली.

या प्रसंगी आपले मनोगत व्यक्त करण्यासाठी आपण श्री धोंडोपंत कडमडेकर-जोशी यांना विशेष अतिथी म्हणून आमंत्रित केले आहे.

श्री धोंडोपंत यांचा चिरंजीव कुमार शंकर आपल्या कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षण घेत आहे.

आजच्या परिसंवादात वेगवेगळया वक्त्यांनी आजच्या तरुणाईबद्दल त्यांची मते मांडली आहेत. श्री धोंडोपंत यांनी प्रत्येक वक्त्याचे मनोगत ऐकले असेलच. या सर्व वक्त्यांच्या वतीने श्री धोंडोपंत यांनी त्यांचे मनोगत व्यक्त करून या परिसंवादाचा समारोप करावा ही विनंती.

त्यानंतर टाळयांच्या गजरात माझे स्वागत केले.

झोपेतून उठल्यामुळे माझे अंग जड झाले होते. जड पाउलांनी मी माईकच्या दिशेने गेलो आणि भाषणाला सुरुवात केली.

“सर्वप्रथम मी व्यासपीठावरील आणि सभागृहातील मान्यवरांना नमस्कार करतो.

खरं तर एवढ्या मान्यवर व्यक्तींच्या मनोगतांवर मी भाष्य करणे म्हणजे प्रभू रामचंद्रांचे लंकेतील पराक्रम या विषयावर कुंभकर्णाने निबंध लिहण्यासारखे आहे (हशा आणि टाळया). तुम्हाला खरं

सांगतो या वक्त्यांच्या भाषणांमुळे आणि प्रिन्सिपल महोदयांच्या भाषणांमुळे माझी झोप उडाली. (टाळया)

आयुष्यात बऱ्याच दिवसांनी या सभागृहाएवढी शांत जागा पाहिली आहे (टाळया) आणि या शांत वातावरणात मन शांत करून बसल्यानंतर आजूबाजूच्या आवाजांकडे कानाडोळा करत मी डोळयावर कातडे ओढून बसलो होतो (बारीक हशा आणि टाळया) पण व्यासपीठावरील मान्यवरांच्या मनोगताने मी खाड्कन जागा झालो. आजच्या प्रसंगी तरुणांना मी एवढेच सांगेन की त्यांनी कायम डोळे उघडे ठेवणे आवश्यक आहे (टाळयांचा पाऊस) अन्यथा त्यांची अवस्था माझ्यासारखी होईल (बारीक हशा).

आजचा कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल सर्व आयोजकांचे अभिनंदन आणि आभार.

भविष्यात देखील असेच कार्यक्रम आयोजित करण्यासाठी शुभेच्छा.

एवढे बोलून मी माझे मनोगत संपवतो.”

माझ्या भाषणानंतर सर्वांनी जोरदार टाळया वाजवल्या... पटकन संपवले म्हणून असेल!

त्यानंतर निवेदकाने पुन्हा माईकचा ताबा घेत सांगितले, “आजच्या कार्यक्रमात श्री धोंडोपंत यांना बोलविण्यामागे एक

महत्वाचे कारण आहे. गेले वर्षभर आम्ही आमच्या महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांसाठी एक स्पर्धा आयोजित केली होती. शाळेतील शिस्त, निटनिटकेपणा, वर्गातील हजेरी, अभ्यासातील प्रगती या निकषांवर या स्पर्धेतून आम्ही शाळेचा आदर्श विद्यार्थी निवडला आहे. त्या विद्यार्थ्यांचे नाव आहे - कु. शंकर धोंडोपंत कडमडेकर-जोशी!

(बराच वेळ टाळयांचा कडकडाट!) त्यानंतर निवेदकाने सांगितले -आम्ही या स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना प्रश्न विचारला होता, ‘आपला आदर्श कोण? ’ त्यावेळी कु. शंकर याने “माझे बाबा” असे उत्तर दिले होते त्यामुळे अशा आदर्श पित्याला आपण आजच्या कार्यक्रमात येण्याचे विशेष आमंत्रण दिले होते.

माझ्यासाठी हा सुखद धक्काच होता. मी शंकऱ्याविषयी किती चुकीचा विचार करत होतो हे मनातल्या मनात आठवले आणि माझी मलाच लाज वाटू लागली. शंकर मात्र हसतहसत पुढे आला आणि स्टेजवरच वाकून माझ्या पाया पडला. पटकन मी त्याच्या हातांना धरून त्याला उभे केले आणि त्याची गळाभेट घेतली. मी तिथूनच शंकरच्या आईकडे पाहिले.... तिच्या डोळ्यात पाणी होते आणि चेहऱ्यावर आनंद होता.... तो आनंद शंकरला पारितोषिक

मिळाल्यापेक्षा शंकर समजूतदार झाल्याची पावती या बक्षिसाच्या रूपाने मिळाल्याचा होता.

* * * * * * * * * * * * * * * * * * *

“पुन्हा एकदा... पुल आपल्या भेटीला...”

या पुस्तकाच्या इतर भागांसाठी संपर्क साधा.

डॉ वीरेंद्र वसंत ताटके

पत्ता - ए - १०५, वनाज परिवार सोसायटी,

कोथरूड, पुणे, ४११०३८

मोबाईल क्रमांक - ९२२५५११६७४

मेल आयडी – tatakevv@yahoo. com

अशाच हजारो पुस्तकांसाठी भेट द्या

www. esahity. com